दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३०८ I शनिवार २२ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## धनगरवाडी कृषी प्रदर्शनात साडेपाच फुटांचा ग्रीन इगुआना ठरतोय आकर्षण



**वाकडी :** श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे सद्गुरू योगीराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित श्री गंगागिरी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात साडेपाच फूट लांबीचा ग्रीन इगुआना सरडा नागरिकांचे आकर्षण ठरत आहे. किशोर चव्हाण व सिद्धार्थ चौधरी हे 'टोनी' नावाच्या या सरड्याचे पालन करतात. सुमारे २२ किलो वजनाच्या या शाकाहारी इगुआनाचे वय दहा वर्षे असून, तो हिरवा भाजीपाला खातो. केरळ येथून आणलेला हा सरडा भव्य आकार व पाठीवरील काटेरी शल्कांमुळे प्रदर्शनात विशेष कुतूहलाचा विषय ठरला आहे. लहान मुलांसह भाविक त्याला पाहण्यासाठी गर्दी करत असून, अनेकजण त्याच्यासोबत छायाचित्रेही काढत आहेत. दि. १८ ते २५ ऑगस्टदरम्यान सुरू असलेल्या कृषी प्रदर्शनाला या आगळ्यावेगळ्या आकर्षणामुळे वेगळाच रंग आला आहे.

## अल्पवयीन मुलीचा विवाह : आई-वडील, नवरदेवासह ४० जणांवर गुन्हा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** अल्पवयीन मुलगी असल्याची माहिती असतानाही तिचा विवाह लावून दिल्याप्रकरणी मुलीचे आई-वडील, नवरदेव, नवरदेवाचे आई-वडील, विवाह लावणारे ब्राह्मण आणि ३० ते ४० नातेवाईकांविरुद्ध कर्जत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कर्जत तालुक्यातील वायसेवाडी येथे १५ ऑगस्ट रोजी हा प्रकार घडला. या घटनेने तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वायसेवाडी येथील चैतन्य मंगल कार्यालयात १५ ऑगस्ट रोजी दुपारी दीडच्या सुमारास अल्पवयीन मुलीचा विवाह आयोजित करण्यात आला होता. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही तिचा विवाह लावण्यात आल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी वायसेवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी शुभम गौतम घोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कर्जत पोलिस ठाण्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियमातील कलम ९, १० व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कर्जत विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर व पोलिस निरीक्षक हनुमान गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक काटे पुढील तपास करीत आहेत.

# दु:खाचा कडेलोट...

# आत्महत्या करणाऱ्या मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही दरीत पडून मृत्यू

- खवड्या डोंगरावरील हृदयद्रावक घटनेत एकाच कुटुंबातील तिघांनी जीव गमावला
- तीन तास सुरू होती मुलाची समजूत काढण्याची धडपड

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**छत्रपती संभाजीनगर : आत्महत्येच्या विचाराने डोंगराच्या कड्यावर गेलेल्या मुलाला वाचविण्यासाठी आई-वडिलांनी केलेली आटोकाट धडपड अखेर काळजाचा ठोका चुकविणाऱ्या शोकांतिकेत बदलली. मुलाला पकडण्यासाठी धावलेल्या वडिलांचा मुलासह दरीत कोसळून मृत्यू झाला. डोळ्यांसमोर पती आणि मुलाचा अंत पाहिल्यानंतर आईनेही टोकाचे पाऊल उचलल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगरच्या तिसगाव परिसरातील खवड्या डोंगरावर शुक्रवारी घडलेल्या या घटनेने परिसर सुन्न झाला.**

या घटनेत कुणाल मुरलीधर चांदवडे (१८), मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे यांचा मृत्यू झाला. हे तिघेही देवळाई-सातारा परिसरातील रहिवासी असल्याची माहिती आहे.

कुणाल सकाळी सुमारे दहाच्या सुमारास खवड्या डोंगरावर गेला होता. तो टोकाचा निर्णय घेण्याच्या मनः स्थितीत असल्याचे समजताच आई-वडील घटनास्थळी पोहोचले. त्यांच्यासोबत स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवानही दाखल झाले. कुणालने डोंगराच्या कड्यावरून खाली येण्यासाठी तब्बल तीन तास त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न सुरू होता.

आई वारंवार मुलाला विनवणी करत होती. स्थानिक नागरिकही त्याच्याशी संवाद साधत होते. मात्र, कुणाल कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता.



तो वारंवार जागा बदलत होता. अखेर वडील मुरलीधर मुलाला पकडण्यासाठी त्याच्याजवळ गेले. मात्र, त्याच क्षणी कुणालने स्वतःला खाली झोकून दिले. त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात मुरलीधर यांचाही तोल गेला आणि दोघेही दरीत कोसळले.

मुलगा आणि पती दोघेही दरीत कोसळल्याचे पाहून संगीता यांना मोठा धक्का बसला. शोक अनावर झाल्यानंतर त्यांनीही डोंगरावरून खाली उडी घेतली. या दुर्घटनेत त्यांचाही मृत्यू झाला. काही क्षणांतच एका कुटुंबातील तिन्ही जीव काळाच्या पडद्याआड गेले.

कुणालने असे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेने मात्र संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एका कुटुंबावर क्षणात कोसळलेल्या या दुःखाने सर्वांनाच सुन्न केले आहे.

### आई-वडिलांचा विचार कर...

**तिसगावचे माजी सरपंच संजय जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, जवळपास तीन तास कुणालची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू होते. आईकडे बघ, उडी मारू नकोस. तुझं भविष्य आहे. आई-वडिलांना सांभाळ, अशी विनवणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत होती. मात्र, तो कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता.**

# दरोड्याच्या तयारीतील श्रीरामपूरचे सराईत गुंड जेरबंद

## बंदुका, काडतुसे अन् दोन आलिशान कार जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या श्रीरामपूर तालुक्यातील सराईत गुन्हेगारांसह पाच जणांना स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून जेरबंद केले. त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, चार जिवंत काडतुसे, मिरची पूड, लोखंडी टॉमी, सहा मोबाईल आणि दोन आलिशान कार असा तब्बल ३२ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत, शेंडीकडे जाणाऱ्या बायपास रस्त्यावरील लवणवाडी परिसरात करण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दरोडा प्रतिबंधक गस्त घालत असताना पोलिसांना पाच संशयित काळ्या रंगाच्या विनाक्रमांकाच्या चारचाकी वाहनांसह कच्च्या रस्त्याच्या आडोशाला थांबले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने पंचांसमक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता पाच जण संशयास्पदरीत्या आढळून आले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये शाहरूख रज्जाक शेख (३४, रा. निमगाव खैरी, ता. श्रीरामपूर), इम्रान अन्वर पठाण (२३, रा. टाकळी, ता. कोपरगाव), तन्जीम नदिम शेख (२६, रा. मिलननगर, येवला), फिरोज चाँद शेख (३५, रा. ताजपार्क, येवला) आणि रेहान रौफ शेख (३०, रा. वॉर्ड क्रमांक २, श्रीरामपूर) यांचा समावेश आहे.

आरोपींची झडती घेतली असता दोन गावठी कट्टे व चार जिवंत काडतुसे, लोखंडी टॉमी, मिरची पूड, सहा मोबाईल तसेच काळ्या रंगाची हुंदाई क्रेटा आणि टाटा हॅरियर या दोन कार असा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ३२ लाख १९ हजार १०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार शाहरूख शेख आणि इम्रान पठाण हे दोघे सराईत गुन्हेगार आहेत. शाहरूख याच्याविरुद्ध दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न आणि आर्म्स ॲक्टसह **(पान ४ वर)**

### ज्यांच्याकडून हत्यारं घेतली, ते पसार..

**शाहरूख शेख आणि इम्रान पठाण यांच्याकडे अधिक चौकशी केली असता जप्त केलेले गावठी कट्टे व काडतुसे आसिफ उर्फ आश्यू पठाण (रा. श्रीरामपूर) आणि राजेंद्र भाऊसाहेब गांगुर्डे (रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर) यांच्याकडून घेतल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. हे दोघे सध्या फरार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.**





## श्री गंगागिरीजी महाराज सप्ताहात व्यसनमुक्तीचा गजर...

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**चितळी :** श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे सुरू असलेल्या सद्गुरू योगीराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहात व्यसनमुक्तीचा गजर करण्यात आला. महंत रामगिरीजी महाराज यांनी भक्तीमध्ये अनन्यता ठेवून त्रिगुणांच्या पलीकडे जाऊन भगवंतावर प्रेम करण्याचे आवाहन केले. व्यसनामुळे विवेक, पैसा आणि जीवन उद्ध्वस्त होते; त्यामुळे दारू, गांजा यांसह सर्व व्यसनांचा त्याग करावा, असे त्यांनी सांगितले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही देश व गाव १०० टक्के व्यसनमुक्त करण्यासाठी समाजातील प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. तसेच गोवंश हत्या करणाऱ्यांवर कठोर शासन झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी पुन्हा स्पष्ट केली. आवाहनाला उपस्थित भाविकांनी हात वर करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**(छाया : परेश कापसे)**

# टाकळीभानमध्ये रात्री उशिरा 'भेसळ तपासणी'ची चर्चा

## ■ दुकाने बंद करून व्यावसायिक पसार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे गुरुवारी रात्री उशिरा अन्न भेसळ तपासणीचे पथक आल्याची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरल्याने छोट्या-मोठ्या व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली. पथक दुकानांमधून विविध खाद्यपदार्थांचे नमुने घेत असल्याची चर्चा होताच अनेक व्यावसायिकांनी कारवाईच्या भीतीने आपापली दुकाने बंद करून तेथून निघून जाणे पसंत केल्याचे समजते.

काही ठिकाणी तपासणी अथवा कारवाई सुरू असल्याची माहिती पसरल्याने नागरिकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली. संबंधित पथकाला पाहण्यासाठी गावातील विविध चौकांमध्ये नागरिकांची गर्दी झाली. काही दुकानांच्या बोर्डवरून मोबाईल क्रमांक मिळवून त्यांना फोन करण्यात येत असल्याचीही चर्चा गावात सुरू होती.

**नियमांची माहिती नसल्याने व्यावसायिकांमध्ये भीती?**

या प्रकारामुळे अनेक छोट्या-मोठ्या व्यावसायिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अन्न सुरक्षा व भेसळ प्रतिबंधक नियम, तपासणीदरम्यान आवश्यक असलेली कागदपत्रे आणि तपासणीची प्रक्रिया याबाबत पुरेशी माहिती नसल्याने कारवाई होईल या भीतीपोटी काही व्यावसायिकांनी आपापली दुकाने बंद करणे पसंत केल्याचे समजते.




तपासणी पथक दुकानात आल्यावर कोणती कागदपत्रे दाखवायची, नमुना घेताना कोणती प्रक्रिया असते आणि नियमभंग आढळल्यास कोणत्या प्रकारची कारवाई होऊ शकते, याबाबत काही व्यावसायिकांमध्ये संभ्रम आहे.

मात्र, दुकाने बंद केल्यावरून संबंधित व्यावसायिकांनी नियमभंग केला होता किंवा त्यांच्यावर कारवाई झाली होती, असा निष्कर्ष काढता येणार नाही.

टाकळीभानमध्ये आलेले हे पथक नेमके कोणत्या विभागाचे होते, त्यामध्ये कोणते अधिकारी होते आणि कोणत्या कारणासाठी तपासणी करण्यात आली, याबाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे हे पथक अन्न व औषध प्रशासनाचेच होते,असे अधिकृत दुजोरा मिळेपर्यंत निश्चितपणे सांगता येणार नाही.

दरम्यान, काही ठिकाणी खाद्यपदार्थांचे नमुने घेतल्याची चर्चा असून, काही व्यावसायिकांशी फोनवरून संपर्क साधण्यात आल्याचेही सांगण्यात येते. मात्र, किती दुकानांची तपासणी झाली, किती नमुने घेण्यात आले, कोणत्या पदार्थांचे नमुने घेण्यात आले किंवा कोणावर कारवाई करण्यात आली, याची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

टाकळीभानमध्ये गुरुवारी रात्री नेमकी कोणती तपासणी झाली, संबंधित पथक कोणत्या विभागाचे होते आणि तपासणीदरम्यान नेमकी कोणती कारवाई करण्यात आली, याची अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच या प्रकरणाचे नेमके चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, अशा प्रकारच्या तपासणी मोहिमांबाबत संबंधित विभागाने स्थानिक नागरिक व व्यावसायिकांना आवश्यक ती माहिती दिल्यास गैरसमज आणि अफवांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या अचानक झालेल्या या पथकाच्या छाप्यामुळे भेसळ करणारे व्यावसायिक यांची धांदल उडाली असून तपासात काही दोषी आढळल्यास होणाऱ्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे येथून पुढे भेसळुक्त मालाची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना चपराक बसणार असून गुणवत्तापूर्ण व नियमावलीप्रम ाणे व्यवसाय करणे बंधनकारक होणार आहे.

# साखर महागली... मग ऊस स्वस्त का?




साखरेच्या दराने अचानक घेतलेली उसळी ही केवळ ग्राहकांच्या खिशाला बसणारी झळ नाही; ती भारताच्या साखर अर्थव्यवस्थेतील विसंगती उघड करणारी घटना आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर साखरेच्या किमती वाढत असताना, या वाढलेल्या पैशाचा योग्य वाटा ऊस उत्पादकाच्या हातात का पोहोचत नाही, हा खरा प्रश्न आहे.

केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, साखरेच्या दरवाढीमागे केवळ इथेनॉल धोरण कारणीभूत नाही. उलट, इथेनॉलसाठी वळवला जाणारा साखरेचा वाटा २०२२-२३ मधील सुमारे १२ टक्क्यांवरून २०२५-२६ मध्ये सुमारे ९ टक्क्यांवर आला आहे. उत्पादनात घट, अतिवृष्टी, पाणी साचणे, लाल कुजवा व खोडकिडा, सणासुदीतील वाढती मागणी आणि काही ठिकाणी साठेबाजी-सट्टेबाजी ही कारणे सरकारने पुढे केली आहेत. साखरेचा पुरवठा पुरेसा असल्याचे सांगत केंद्राने व्यापाऱ्यांच्या साठ्यावर मर्यादा घातली आहे.

मात्र, या स्पष्टीकरणानंतरही मूलभूत प्रश्न कायम राहतो की, साखर महागली, पण ऊस स्वस्त का? सरकारने २०२६-२७ हंगामासाठी उसाचा रास्त व किफायतशीर दर ३६५ रुपये प्रतिक्विंटल निश्चित केला आहे. त्याचवेळी मागील हंगामातील ऊस देणी मोठ्या प्रमाणात अदा झाल्याचा सरकारचा दावा आहे. २० एप्रिल २०२६ पर्यंत २०२५-२६ हंगामातील देयकांपैकी ८८.६ टक्के रक्कम अदा झाल्याचे अधिकृत आकडे सांगतात. पण शेतकऱ्याचा अनुभव केवळ सरकारी आकडेवारीत मावत नाही. त्याच्यासाठी ऊस म्हणजे वर्षभराचा खर्च, पाणी, मजुरी, खते, औषधे आणि कर्जाचा भार. साखरेच्या बाजारभावात वाढ होत असताना कारखान्यांकडून वेळेवर ऊसबिले मिळाली नाहीत, तर दरवाढीचा फायदा उत्पादकापर्यंत पोहोचणार कसा? साखर कारखानदारांच्या बाजूने पाहिले तर चित्र वेगळे आहे. ऊस खरेदी, प्रक्रिया, मजुरी, वाहतूक, व्याज, ऊर्जा आणि उत्पादन खर्च वाढत असताना साखरेचा कारखानास्तरावरील दर हा संपूर्ण आर्थिक गणिताचा एक भाग आहे. साखरेबरोबर इथेनॉल, वीज, मळी, बगॅस आदी उपपदार्थांतून मिळणारे उत्पन्नही कारखान्याच्या आर्थिक आरोग्यात महत्त्वाचे ठरते. त्यामुळे केवळ किरकोळ साखरेच्या दरावरून कारखान्याचा नफा किंवा शेतकऱ्याचा वाटा ठरवणेही योग्य ठरणार नाही. साखर तज्ज्ञांच्या दृष्टीने सध्याचे संकट हे मागणी-पुरवठा, उत्पादनातील अनिश्चितता, साठेबाजी आणि जागतिक बाजारातील बदल यांचे मिश्रण आहे. सरकारनेही अलीकडील कारखानास्तरावरील दरवाढीमागे सध्याच्या मागणी-पुरवठ्याच्या मूलभूत स्थितीपेक्षा साठेबाजी व सट्टेबाजीचा प्रभाव असल्याचे नमूद केले आहे.

म्हणूनच या प्रश्नाचे उत्तर 'इथेनॉल' किंवा 'साठेबाजी' या एका शब्दात शोधणे चुकीचे ठेल. खरी गरज आहे ती ऊस-साखर-इथेनॉल या संपूर्ण साखळीचे पारदर्शक अर्थशास्त्र उघड करण्याची. साखरेचा दर वाढला की ग्राहकाला अधिक पैसे मोजावे लागतात; पण त्यातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त मूल्यवर्धनात ऊस उत्पादकाचा हिस्सा किती वाढतो, याचे स्पष्ट उत्तर मिळाले पाहिजे. कारखान्यांची आर्थिक स्थिती, साखरेचा उत्पादन खर्च, उपपदार्थांमधून मिळणारे उत्पन्न आणि शेतकऱ्यांना दिलेली ऊसबिले यांचा सार्वजनिक हिशेब झाला पाहिजे.

दहा लाख टन शुल्कमुक्त आयात करून तात्पुरता पुरवठा वाढवणे किंवा साठेबाजीवर निर्बंध आणणे हे ग्राहकहिताचे उपाय असू शकतात. पण दीर्घकालीन उपाय म्हणून शेतकऱ्याला वेळेवर आणि न्याय्य मोबदला, कारखान्यांना व्यवहार्य दर आणि ग्राहकाला स्थिर किंमत या तिन्हींचा समतोल साधणारे धोरण आवश्यक आहे. साखरेचा गोडवा ग्राहकाच्या चहात आहे; पण तिची खरी किंमत शेतकऱ्याच्या घामात आहे. त्यामुळे साखर महागण्याची चिंता जितकी ग्राहकाची आहे, तितकीच तिच्या वाढलेल्या मूल्याचा न्याय्य वाटा ऊस उत्पादकाला मिळतोय की नाही, याची चिंता सरकारचीही असली पाहिजे.

# शिर्डीत ८ हजार भाविकांच्या साक्षिने पारायण सोहळ्याची सांगता



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, नाट्य रसिक मंच, शिर्डी आणि शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ ऑगस्ट, २०२६ रोजी सुरू झालेल्या श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याची सांगता गोपाळकाला कीर्तनाने झाली.दिनांक १३ ते २० ऑगस्ट पर्यंत चाललेल्या या पारायण सोहळ्यामध्ये शिर्डी व पंचक्रोशीतील सुमारे ८ हजार २०० पारायणार्थी सहभागी झाले होते. काल दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी अध्याय क्रमांक ५३ वाचन होऊन ग्रंथ समाप्ती झाली. त्यानंतर श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची पूजा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वंदना गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आली.

त्यानंतर दुपारी ०२.०० वाजता श्री साईसच्चरित पारायण समाप्तीच्या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीत पारंपारिक संबळ वाद्यांचे १०-१२ पथके, श्री देव कुडाळेश्वर मित्र मंडळ, कुडाळ यांचे ३ धार्मिक देखाव्यांचे चित्ररथ आणि विशेष आकर्षण म्हणून रंजीनी आर्टस, मालाप्पुरा, केरळ यांचे पारंपारिक वाद्य व दाक्षिणात्य नृत्यासह विविध सोंगे यांचा समावेश होता.

आज सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. सौ. राधिका कालेकर, कोल्हापूर यांचे गोपाळकाला कीर्तन झाले. कीर्तनानंतर दहीहंडी फोडून पारायण सोहळ्याची सांगता करण्यात आली. यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, मंदिर प्रमुख विष्णु थोरात, संरक्षण अधिकारी रोहीदास माळी, नाट्य रसिक मंचाचे पदाधिकारी आदींसह पारायणार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवासा येथे संत महंतांच्या उपस्थितीत रविवारी ग्रंथपूजन सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान व संत श्री ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी असलेल्या नेवासा येथे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान व आनंदोत्सव चॅरीटेबल ट्रस्ट अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्री ज्ञानेश्वरी चिंतन-खंड १ तत्त्वज्ञान प्रबोध' व 'खंड २- जीवन प्रबोध' या बृहद् ग्रंथांचा ग्रंथपूजन सोहळा रविवार दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज ''पैस''खांब मंदिरामध्ये आयोजित करण्यात आला आहे.




यावेळी होणाऱ्या ग्रंथ पूजन सोहळयाला श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत लाखो भाविकांचे श्रध्दास्थान राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे महंत व विश्वस्त वेदांताचार्य हभप देवीदास महाराज म्हस्के शास्त्री, महंत मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज,सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख समन्वयाचार्य वाणीभूषण महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर, हभप गोविंद महाराज जाटदेवळेकर, हभप नामदेव शास्त्री महाराज, भागवताचार्य हभप योगेश महाराज पवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब अनाजी जाधव यावेळी उपस्थित रहाणार आहेत.

पंचक्रोशीतील भाविकांनी होणाऱ्या या ग्रंथपूजन सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाणी मागण्याच्या बहाण्याने महिलेचे दोन तोळ्यांचे मंगळसूत्र लांबवले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

## पानोडीत भरदिवसा धाडसी चोरी

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील जाधव वस्ती परिसरात शुक्रवारी भरदिवसा किराणा दुकानात पाणी मागण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र ओरबाडून नेल्याची घटना घडली. या धाडसी चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पानोडी येथील रंगनाथ काशिनाथ मुंढे यांच्या 'गुरु माऊली' किराणा दुकानात दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलवरून काळे कपडे परिधान केलेले दोन तरुण आले. त्यावेळी दुकानात रंगनाथ मुंढे यांच्या सून अनिता सचिन मुंढे या उपस्थित होत्या.

चोरट्यांनी सुरुवातीला पाण्याची बाटली मागितली. त्यानंतर ५०० रुपयांची नोट देत सुट्टे पैसे मागितले. अनिता यांनी सुट्टे पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर एका चोरट्याने त्यांच्या हातात १० रुपयांचे नाणे दिले. याचवेळी लक्ष विचलित करून दुसऱ्याने त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जोरात ओढले. चोरी केल्यानंतर दोघांनी मोटारसायकलवरून पानोडीच्या दिशेने वेगाने पलायन केले.



अनिता यांनी आरडाओरड केल्यानंतर रंगनाथ मुंढे यांनी दुचाकीवरून चोरट्यांचा पाठलाग केला. गावातील तरुणांनाही फोन करून माहिती देण्यात आली. तरुणांनी रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला; मात्र चोरट्यांनी पिंपरी लौकीच्या दिशेने पलायन केले.दरम्यान, या घटनेची तक्रार देण्यासाठी गेलेल्या मुंढे कुटुंबीयांना पोलिसांनी 'उद्या या', असे सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. परिसरात यापूर्वीही अशाच प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्याने सराईत टोळी सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी तातडीने चोरट्यांचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# सरपंच मंगेश साबळे यांच्यावर दाखल खोटे गुन्हे मागे घ्या : निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** फुलंब्री गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते सरपंच मंगेश साबळे यांच्यावर नुकतेच खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेले असून हे खोटे गुन्हे व त्यांच्यावर झालेली तडिपारीची कारवाई तात्काळ मागे घेऊन ती रद्द करण्यात यावी अशी मागणी नेवासा येथील शिवसेना भाजप व हिंदुत्ववादी संघटनेच्या वतीने करण्यात आली.




याबाबत नेवासा तहसीलदार डॉ.संजय बिरादार व नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना निवेदन देण्यात आले.सामाजिक क्षेत्रात काम करत असलेले फुलंब्री गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते व सरपंच मंगेश साबळे जनतेच्या प्रश्नांच्या संदर्भात आवाज उठवला म्हणून त्यांच्यावर जाणूनबुजून सूडबुद्धीने तडीपार करण्याची कारवाई झालेली असून खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेले असून सदरचे हे खोटे गुन्हे मागे घेवून त्यांच्यावर झालेली कारवाई रद्द करण्यात यावी म्हणून हे निवेदन नेवासा तालुक्याच्या वतीने देण्यात आले आहे. यावेळी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,नेवासा तालुका भाजपचे तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे पाटील, शिवसेना नेते सतीश कर्डीले, नगरसेवक कृष्णाभाऊ परदेशी, विश्व हिंदू परिषदेचे प्रशांत बहिरट, शिवसेनेचे तालुका संपर्क प्रमुख बापूसाहेब दारकुंडे,सतीश क्षीरसागर, धर्मेद्र काकडे, युवा संपर्क प्रमुख अभिजीत दारकुंडे, पोपटराव शेंडगे आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# दोडी बुद्रुक महिलेच्या हत्येचा नेवासा कुंभार समाजाकडून तीव्र निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** सिन्नर तालुक्यातील दोडी बुद्रुक येथे कुंभार समाजातील विधवा महिलेची हात-पाय बांधून व गळ्याला फास लावून विहिरीत फेकून हत्या केल्याच्या घटनेचा नेवासा तालुका कुंभार समाज संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. दोषींवर कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, घटनेच्या आठ दिवसांपूर्वी महिलेच्या १३ वर्षीय नातीवर अत्याचार झाल्याचा आरोप असून, याप्रकरणी पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा मागे घेण्यासाठी पीडित कुटुंबावर दबाव व धमकी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. महिलेने दबावाला न जुमानल्याने हत्या झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. सरपंच, पोलीस पाटील यांच्यासह संशयितांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण व आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.दरम्यान, २४ तासांत ठोस कारवाई न झाल्यास महाराष्ट्रभर रस्तारोको छेडण्याचा इशारा कुंभार समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य कुंभार समाजाचे सदस्य रामचंद्र मारुती खंडाळे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष ॲड. राजेंद्र बोरुडे, नेवासा तालुकाध्यक्ष शिवाजीराव महाशिकारे, विष्णू शिर्के, डॉ. भाऊसाहेब आव्हाडकर, पांडुरंग साळुंखे, डॉ. लक्ष्मण खंडाळे, नितीन खंडाळे, किरण साळुंखे,अभिजीत महाशिकारे, अशोक साळुंखे, रमेश साळुंखे, बाबासाहेब देवतरसे, विठ्ठल काळे, अशोक काळे, अमोल भागवत, सुरज भागवत, किरण उपाध्ये, आदित्य खंडाळे, दीपक दळे, गणेश लोणकर, महेश साळुंखे, अशोक कदम, कचरू बोरुडे, अनिल शिर्के, भारत कदम व रावसाहेब कदम आदी उपस्थित होते.

# टाकळीभान गणेश खिंड रोडला बिबट्याचे दर्शन ; नागरिक भयभीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील गणेश खिंड रोडला लांडगे यांच्या शेताच्या ओढ्याजवळ येथील नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले असून त्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. सदर अंतरावरून जवळच खंडोबा वस्ती जिल्हा परिषदेची शाळा असून छोटी लहान मुले त्या शाळेत ये जा करतात. तसेच शेतामध्ये काम करणारे शेतकरी, शेतमजूर यांचेही शेतीचे काम सुरू असते. परंतु या ठिकाणी होत असलेल्या बिबट्याच्या वारंवार दर्शनाने नागरिक भयभीत झाले आहेत. त्यांना शेतात काम करणे, जनावरांसाठी चारा आणणे मुश्किल झाले आहे. व बिबट्याच्या धाकाने शेतामध्ये शेतकरी, मजूर शेतात जाण्यास तयार नाही. तसेच त्या रस्त्याने जाणारे शाळकरी मुले, सर्व नागरिक धास्तावले आहेत. काही दिवसांपूर्वी दाभाडे वस्ती येथे भरवस्तीत बिबट्या आला होता व त्याने पाळीव कुत्र्याचा फाडशा पाडला होता. अशा टाकळीभान मध्ये बिबट्याच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडत असून, बिबट्याने अनेक पाळीव कुत्रे शेळ्या यांचा फाडशा पाडलेला आहे. त्यामुळे नागरिक हादरले आहेत. गणेश खिंड रोडला खंडोबा वस्ती शाळा ते खंडोबा मंदिर या परिसरामध्ये बिबट्याचा वावर असून त्याचे त्या परिसरात वारंवार दर्शन होत आहे. तरी वन विभागाने तातडीने जागरूक होऊन या परिसरामध्ये लांडगे यांच्या शेताच्या ओढ्याजवळ किंवा योग्य त्या ठिकाणी पिंजरा लावावा व सदर बिबट्यास जेरबंद करावे अशी कळकळीची मागणी येथील नागरिकांनी केली आहे. काही विपरीत घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण असाही प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

# महिला मंडळातर्फे विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महिला मंडळ, श्रीरामपूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी मोफत क्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दादा वामनराव जोशी नवीन मराठी शाळा आणि महाराष्ट्र सेवा मंडळ प्राथमिक विद्यालय येथे हे शिबिर घेण्यात आले. महाराष्ट्र सेवा मंडळ प्राथमिक विद्यालयातील ५५, तर दादा वामनराव जोशी नवीन मराठी शाळेतील ३७५ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. अशा प्रकारे दोन्ही शाळांमधील एकूण ४३० विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला. सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट डॉ. अर्चना सोमाणी व त्यांच्या पथकाने सलग चौथ्या वर्षी या उपक्रमासाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा रक्तगट नोंदविल्यामुळे भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत त्याचा उपयोग होणार असल्याचे विश्वस्त अनिता जोशी यांनी सांगितले. उपक्रमास प्रमुख विश्वस्त ज्योती भळगट यांचे मार्गदर्शन लाभले. शैलजा वाघमारे, डॉ. अंजली आगाशे व सुजाता मालपाठक यांचे आर्थिक सहकार्य मिळाले. सचिव स्मिता जोशी, खजिनदार सुनिता संभूस व कार्यकारिणी सदस्यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले. अध्यक्षा रमा फोपळे यांनी आभार मानले.

# रेक्टल प्रोलॅप्सवरील प्रगत शस्त्रक्रियेचे डॉ. विखे हॉस्पिटलमध्ये यशस्वी प्रात्यक्षिक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये रेक्टल प्रोलॅप्स (गुदाशय बाहेर येण्याची समस्या) या गुंतागुंतीच्या आजारावरील प्रगत शस्त्रक्रियेचे यशस्वी प्रात्यक्षिक नुकतेच पार पडले. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि विविध विभागांतील समन्वयातून ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मेडिकल डायरेक्टर डॉ. अभिजित दिवटे यांच्या नेतृत्वाखाली हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेबरोबरच वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणाला प्राधान्य दिले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रगत उपचारपद्धती व शस्त्रक्रिया तंत्रांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या शस्त्रक्रियेच्या आयोजनात सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. गाडेकर यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्जरी विभागातील तज्ज्ञ डॉक्टर, कन्सल्टंट्स, फॅकल्टी मेंबर्स आणि पदव्युत्तर निवासी डॉक्टरांनी विविध टप्प्यांत सहभाग घेतला. प्लास्टिक सर्जन डॉ. अविनाश काळे यांनीही आपल्या तज्ज्ञ अनुभवातून महत्त्वपूर्ण योगदान दिले.

भूलविभागाचे प्रमुख डॉ. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲनेस्थेशियोलॉजी टीमने रुग्णाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत भूल व्यवस्थापन आणि शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाच्या स्थितीचे बारकाईने निरीक्षण केले. ऑपरेशन थिएटर नर्सिंग टीम, तांत्रिक कर्मचारी व सहाय्यक कर्मचाऱ्यांनीही शस्त्रक्रियेच्या तयारीपासून रुग्णाच्या शस्त्रक्रियेनंतरच्या काळजीपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.



या प्रात्यक्षिकामुळे पदव्युत्तर निवासी डॉक्टरांना प्रगत शस्त्रक्रिया तंत्राचे प्रत्यक्ष निरीक्षण व अनुभवी तज्ज्ञांकडून प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. रुग्णसेवा आणि वैद्यकीय शिक्षण यांचा प्रभावी समन्वय साधणारे हे प्रात्यक्षिक हॉस्पिटलच्या वैद्यकीय कार्यक्षमतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरले.

आधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि बहुविभागीय समन्वयाच्या माध्यमातून अहिल्यानगर परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या हॉस्पिटलच्या प्रयत्नांना या उपक्रमामुळे अधिक बळ मिळाले.

# शिव दुर्गा अभियान अंतर्गत शिर्डीत महिला मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिव दुर्गा अभियानाच्या निमित्ताने आज शिर्डी येथे कोपरगाव व शिर्डी विधानसभा मतदारसंघातील महिला पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या बैठकीचा मुख्य उद्देश महिला संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे आणि महिला सशक्तीकरणाला खरी चालना देणे हा होता. यावेळी राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला. तसेच राजकारणात महिलांचा सक्रिय सहभाग कसा वाढेल, ग्रामीण भागातील महिलांसाठी बचत गटांची निर्मिती, त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवणे, महिलांशी थेट संवाद साधणे आणि शिवसेना महिला सेनेच्या नामकरणासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील महिला आजही अनेक अडचणींना तोंड देत आहेत. त्यांना शासनाच्या योजना थेट त्यांच्या दारापर्यंत पोहोचवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून खासदार भाऊसाहेब वाकचौरे,आमदार मनिषाताई कायदे,कल्पनाताई करजे, सरिताताई कोल्हे,आणि सुषमाताई उबाळे,यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता राजकारण आणि समाजकारणात पुढे येऊन नेतृत्व करावे. शिवसेना ही नेहमीच महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हाप्रमुख नितीन औताडे , अनिताताई जगताप, सुनिताताई शेळके ,मिनाक्षी डूबल,आरती गाढे मीनाक्षी वाकचौरे, नगरसेविका सुनिता गोंदकर, आशा कोते, महेश देशमुख ,सागर बोठे, रावसाहेब थोरात ,जिल्हाप्रमुख कमलाकर कोते,यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यास सहा महिने सक्तमजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महावितरणच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, धक्काबुक्की व मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुंजाळ (ता. राहुरी) येथील बाबासाहेब एकनाथ चेंडवाल (वय ५०) यांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. तसेच पाच हजार रुपये दंड ठोठावला असून दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद भोगावी लागणार आहे. ७ डिसेंबर २०२० रोजी महावितरणचे अभियंता मंगेश गांगुर्डे 'एक गाव, एक दिवस' अभियानांतर्गत वीज बिलाबाबत जनजागृती करीत होते. त्यावेळी अनधिकृत वीज जोडणी आढळून आल्याने कर्मचारी वायर काढत होते. त्यावेळी चेंडवाल यांनी कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून गांगुर्डे यांच्या हातातील मोबाईल हिसकावला. तसेच धक्काबुक्की व मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे न्यायालयात नमूद झाले. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३५३, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल झाला. सरकार पक्षाने चार साक्षीदार तपासले. पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने कलम ३५३ अंतर्गत शिक्षा सुनावली. जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अनिल डी. ढगे यांनी काम पाहिले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### मुंढेवस्ती शाळेचा विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**निमगाव पागा** : संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुंढेवस्ती येथील इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परिक्षेत उल्लेखनीय यश संपादित केले. शाळेतील मोहम्मद अली नजीम पिंजारी ह्या विद्यार्थ्याने जिद्द, मेहनत आणि चिकाटीने अभ्यास करुन ३०० पैकी २३८ गुण मिळवले. जिल्हा स्तरीय गुणवत्ता धारक विद्यार्थी म्हणून विशेष यश मिळवले आहे. त्याला पुढील तीन वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्याला वर्गशिक्षक नारायण शेरमाळे, मुख्याध्यापक बाबासाहेब डगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

### बासुरी वादनात प्रगती भावसार हिला एनसीसीत गोल्ड मेडल



**श्रीरामपूर** : येथील आर.बी.एन.बोरावके कॉलेजमधील इयत्ता एफ.वाय.बी.ए.मधील विद्यार्थीनी प्रगती संदीप भावसार हिला १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनी प्राचार्य डॉ.पी.व्ही.बडधे यांच्या हस्ते एन.सी.सी.गोल्ड मेडल देवून गौरवण्यात आले.५७-महाराष्ट्र बटालीयन एन.सी. सी.अहिल्यानगर अंतर्गत बोरावके कॉलेजमध्ये घेण्यात आलेल्या एन.सी.सी. कॅम्पमधील कल्चरल प्रोग्राममध्ये प्रगतीने भाग घेवून उत्तम बासुरी वादन केले होते. त्याचा गौरव म्हणून स्वातंत्र्यदिनी तिचा गुलाबपुष्प व गोल्ड मेडल देवून सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल प्रगतीचे कॉलेजचे प्राचार्य डॉ.पी.व्ही.बडधे, मेजर सुनील देवकर, लेफ्टनंट किरण पोपेरे, प्राध्यापक वृंद, पालक तसेच समस्त श्रीरामपूर भावसार समाजाकडून कौतुक होत आहे. पत्रकार संदीप भालचंद्र भावसार यांची ती कन्या आहे.

### सादतपूरमध्ये दिवसाढवळ्या बिबट्याचा संचार; पिंजरा लावूनही शोध सुरूच

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील सादतपूर येथील मगर वस्ती परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सोमवारी (दि. १७) दिवसाढवळ्या बिबट्या कुत्रा व मांजराचा पाठलाग करताना सीसीटीव्हीत कैद झाला. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या मागणीनंतर वनपरिक्षेत्र अधिकारी नम्रता हिरे, वनपाल आर. के. पवार, ए. व्ही. साळवे व वनरक्षक बाळासाहेब डेंगळे यांनी पाहणी करून पिंजरा लावला. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी गस्तही वाढविण्यात आली आहे. मात्र, बिबट्या दिसल्यानंतर २४ तासांनी पिंजरा लावण्यात आला आणि तीन दिवस उलटूनही बिबट्या जेरबंद झालेला नाही. वनविभागाच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून, बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे.

### आदर्श विद्यालयात वृक्षारोपण



**सोनई** : श्री हनुमान ग्रामीण विकास व संशोधन मंडळ पानसवाडी संचलित प्राथमिक आदर्श विद्यालयात आज जलसंधारण सप्ताह साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी विद्यालयाच्या प्रांगणात प्राथमिक आरोग्य केंद्र सोनईच्या डॉ. क्षितिजा इंगळे, आरोग्यसेवक स्वप्नील उके, मोहन ढवळे, आरोग्यसेविका अरुणा म्हस्के व आशा सेविका प्रियंका तोडकर, वंदना औटी, शैला वैरागर आणि स्कूल कमिटीची अध्यक्ष अरूण चांडघोडे तसेच एकनाथ कुसळकर आणि शाळेचे मुख्याध्यापक अनिल दरंदले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शिक्षक वृंद शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात ५ मेंढ्या ठार

## संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीला ठोकले टाळे । तीन तासांनांतर मध्यस्थीने टाळे उघडले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पिंप्री लौकी येथे मोकाट कुत्र्यांच्या कळपाने मेंढ्यांवर केलेल्या भीषण हल्ल्यात पाच मेंढ्या ठार झाल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शुक्रवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकले. मृत व जखमी मेंढ्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणून ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. तब्बल तीन तासांच्या नाट्यमय घडामोडींनंतर ग्रामस्थांच्या मध्यस्थीने कार्यालयाचे टाळे उघडण्यात आले. पिंप्री लौकी येथील शेतकरी व मेंढपाळ पोपट दातीर यांच्या मेंढ्यांवर गुरुवारी दुपारी १० ते १५ मोकाट कुत्र्यांच्या टोळीने अचानक हल्ला केला. कुत्र्यांनी मेंढ्यांचे लचके तोडल्याने पाच मेंढ्या जागीच ठार झाल्या, तर चार मेंढ्या गंभीर जखमी झाल्या. जखमी मेंढ्यांची प्रकृतीही चिंताजनक असून, या घटनेमुळे दातीर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



**मृत मेंढ्या ग्रामपंचायतीसमोर आणल्या**

दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील मेंढपाळांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचा निषेध करण्यासाठी शुक्रवारी सकाळी पोपट दातीर यांच्यासह ग्रामस्थांनी मृत व जखमी मेंढ्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणल्या. मेंढ्यांना 'वाघूर' (जाळी) लावून प्रशासनाच्या कारभाराचा निषेध करण्यात आला. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकण्यात आले. मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. काही तासांच्या चर्चेनंतर ग्रामस्थांच्या मध्यस्थीने कार्यालयाचे टाळे काढण्यात आले. मात्र, या काळात परिसरात तणावपूर्ण वातावरण होते.

**शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न**

गावात तसेच शिवारात बाहेरून आणून सोडलेल्या मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हे कुत्रे केवळ शेळ्या-मेंढ्यांवर किंवा इतर जनावरांवरच हल्ला करीत नाहीत, तर शाळेत जाणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण झाला आहे, अशी भीती पालकांनी व्यक्त केली. यापूर्वीही शेळ्या व कोंबड्यांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ले केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

**रानडुकरांच्या उपद्रवाने शेतकरी त्रस्त**

मोकाट कुत्र्यांच्या दहशतीसोबतच रानडुकरांच्या उपद्रवानेही पिंप्री लौकी परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. गेल्या महिनाभरापासून पानोडी रोड, दरा परिसर, पिंप्री फाटा आणि गिते वस्ती भागात रानडुकरांचे कळप ऊस व मका पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. रात्रीच्या वेळी रानडुकरे शेतात घुसून पिकांची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांना रात्रभर शेताची राखण करावी लागत आहे. वनविभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पावसाची अनिश्चितता, वाढती महागाई आणि उत्पादन खर्चाच्या संकटात असलेला शेतकरी आता वन्यप्राण्यांसह मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवानेही हैराण झाला आहे.

बिबट्याची दहशत, मोकाट कुत्र्यांचा उपद्रव आणि रानडुकरांकडून पिकांचे नुकसान अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. ग्रामपंचायत, वनविभाग व प्रशासनाने संयुक्तपणे तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पिंप्री लौकी ग्रामस्थांनी दिला आहे.

## मा.आ.अशोक काळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर येथे संस्थेचे चेअरमन व कोपरगावचे माजी आमदार अशोक काळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे आणि विश्वस्त आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या पुढाकाराने या पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सन २०१० पासून वृक्षारोपणाची परंपरा सुरू आहे.

ही परंपरा आजही अविरतपणे सुरू ठेवत यंदाही स्काऊट-गाईड आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शाळा परिसरात झाडे लावण्यात आली. गौतम पब्लिक स्कूलमध्ये सन २०१० पासून माजी आ. अशोकराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्याची परंपरा अखंडपणे सुरू असून यंदाही ही परंपरा कायम ठेवण्यात आली. विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून झाडांचे संगोपन, पर्यावरणाचे संरक्षण आणि



भावी पिढ्यांसाठी हरित परिसर निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त केला. स्काऊट शिक्षक नसिर पठाण आणि एन.सी.सी. टी.ओ. इसाक सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमासाठी क्रीडा प्रमुख रमेश पटारे, माध्यमिक पर्यवेक्षिका ज्योती शेलार मॅडम, प्राथमिक पर्यवेक्षक राजेंद्र आढाव, सॅनिटेशन विभागाचे सोनू जाधव आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बँकेच्या सेवेचा लाभ घ्यावा : अध्यक्ष होंडे

### मुळा बँकेची वार्षिक सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेली मुळा सहकारी बँकेच्या ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन माणिकराव होंडे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सदर बँकेने खातेदाराना जलद गतीने माहिती उपलब्ध व्हावी म्हणून आरटीजीएस, एनएफटी, सीटीएस, चेक बुक व एसएमएस सारख्या सुविधाचा लाभ घेण्याचे तसेच बँकेच्या ठेवी व प्रगती वाढण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने सर्वांनी साथ देण्याचे आवाहन अध्यक्ष माणिकराव होंडे व उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे यांनी सभेत केले. अहवाल वाचन व्यवस्थापक श्री. ए. एम. कुलकर्णी यांनी केले. उपस्थित संचालक रामभाऊ कराळे, जगन्नाथ मिसाळ, एकनाथ जगताप, शिवाजी वाकचौरे, भानुदास रेडे, जालिंदर एळवंडे, विश्वनाथ बनकर, पढरीनाथ मोरे, उत्तमराव शिरसाठ, एस. के. दरंदले, सोपानराव चौधरी, आदी होते. मुळा कारखानावर नवनिर्वचित संचालक म्हणून दिनकर घावटे एकनाथ जगताप, व कांगोणी सोसायटीच्या अध्यक्षपदी मच्छिन्द्र कर्डीले, पाचूदा सोसायटीच्या अध्यक्षपदी भारत होंडे यांची निवड झाल्याबद्दल बँकेच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

## १३ हजार राख्यांतून सीमेवरील जवानांना श्रीरामपूरच्या बहिणीची प्रेमाची साद!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : देशाच्या सीमेवर कडाक्याची थंडी, प्रतिकूल हवामान आणि जीवाची पर्वा न करता पहारा देणाऱ्या जवानांसाठी श्रीरामपूरच्या पूजा चव्हाण यांनी बहिणीचे प्रेम आणि कृतज्ञता जपणारा अनोखा उपक्रम सुरू ठेवला आहे. गेल्या १२ वर्षांपासून त्या देशाच्या विविध सीमावर्ती भागात तैनात जवानांना राख्या पाठवत असून, यंदा तब्बल १३ हजार राख्या स्वखर्चाने पाठवल्या आहेत.

जम्मू-काश्मीर, लेह-लडाख, सियाचीन, कारगिल, पंजाब, राजस्थान, आसाम, मेघालय, सिलिगुडी यांसह विविध ठिकाणी कर्तव्य बजावणाऱ्या जवानांपर्यंत या राख्या पोहोचवल्या जात आहेत. या उपक्रमाची प्रेरणा मालुंजे येथील शहीद जवान भाऊसाहेब बडाक यांच्या



आठवणीने मिळाल्याचे पूजा चव्हाण सांगतात.

बडाक हे कर्तव्यावर जाण्यापूर्वी बहिणीसाठी कपडे खरेदी करण्यासाठी आले असताना त्यांची पूजा चव्हाण यांच्याशी ओळख झाली होती. त्यानंतर अवघ्या आठ दिवसांत ते शहीद झाल्याची बातमी आली. या घटनेने व्यथित झालेल्या पूजा यांनी जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संकल्प केला. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे राख्या मोठ्या बाजारपेठेतून न घेता श्रीरामपूरमधील छोट्या दुकानदारांकडून तसेच महिला बचत गटांकडून खरेदी केल्या जातात. त्यामुळे जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच स्थानिक व्यावसायिक व महिलांना रोजगाराची संधी मिळते.

या कार्यात पती हर्षद चव्हाण व कुटुंबाची भक्कम साथ मिळत असल्याचे पूजा सांगतात. सुरुवातीला एक हजार राख्यांपासून सुरू झालेला हा उपक्रम आता १३ हजारांवर पोहोचला आहे. जवानांकडून पत्रे व कौतुकाचे संदेशही त्यांना मिळतात.

## कृषी क्षेत्रात एआय, रोबोटिक्स व ड्रोन तंत्रज्ञानाला मिळणार नवी दिशा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, मशीन लर्निंग आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेतीचे यांत्रिकीकरण, उत्पादकता वाढ आणि गुणवत्तापूर्ण अन्न उत्पादनाला चालना देण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या उपस्थितीत संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके आणि पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी बोलताना डॉ. खर्चे यांनी कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची हीच योग्य वेळ असून, या करारामुळे शेतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. पाण्याचा व अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म व अचूक शेती तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या कृषी जोखमींचे व्यवस्थापन करण्यासाठी एआय आधारित संशोधन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सोनवणे यांनी दोन्ही संस्थांकडे आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या संधी असल्याचे नमूद केले. कराराच्या माध्यमातून एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स, बौद्धिक संपदा हक्क, ड्रोन तंत्रज्ञान आणि डेटा सायन्स यांसारख्या विषयांवर संयुक्त संशोधन करता येणार आहे. यावेळी डॉ. भारत काळे, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. सचिन नलावडे, डॉ. अनिल माहेश्वरी, डॉ. राहुल सोनकांबळे, डॉ. सुभाष भालेकर, डॉ. सुनील कदम आदी उपस्थित होते.

# महिलांच्या प्रश्नांना व्यासपीठ देत शिवसेना संघटन बळकट करणार : मनीषा कायंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शिवसेनेशी जोडलेल्या महिलांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी, समस्या व अपेक्षा जाणून घेत त्यांचा संघटनेतील सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर देणार असल्याची माहिती शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी दिली.

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महिला शिवसेना आघाडीच्या वतीने राज्यभर 'शिवदुर्गा संवाद दौरा' सुरू करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर व अकोले तालुक्यातील महिला पदाधिकाऱ्यांची बैठक गुरुवारी (दि. २०) आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात घेण्यात आली. यावेळी आमदार मनीषा कायंदे यांनी महिला पदाधिकाऱ्यांशी विविध विषयांवर संवाद साधला.

कायंदे म्हणाल्या, स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी महिलांचा 'रणरागिणी' म्हणून सन्मान केला. हीच परंपरा पुढे नेत ग्रामीण भागातील महिलांना संघटनेत अधिकाधिक संधी देण्यात येणार आहेत. महिलांच्या समस्या, अपेक्षा आणि संघटना मजबूत करण्यासाठीच्या सूचना जाणून घेण्यासाठी हा संवाद दौरा राज्यभर राबविण्यात येत आहे. यासाठी तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, त्यांच्या



### संकटात महिलांना आ. खताळ यांची तत्काळ मदत

बैठकीत महिला पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त केले. महिलांवर संकट आले असता खताळ तत्काळ दूरध्वनीवर प्रतिसाद देऊन मदतीसाठी पुढाकार घेत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर मनीषा कायंदे व सुवर्णा करंजे यांनी समाधान व्यक्त केले.

माध्यमातून महिलांशी प्रत्यक्ष संवाद साधला जाणार आहे. बैठकीस आमदार अमोल खताळ, शिवसेना उपनेत्या सुवर्णा करंजे,

> *तालुक्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासोबतच रखडलेली औद्योगिक वसाहत मार्गी लावण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. जनतेच्या आशीर्वादामुळे विकासकामे करण्याची संधी मिळाली असून, प्रामाणिकपणे काम सुरू आहे.*
>
> **अमोल खताळ, आमदार**

सरिता माळी, जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, नितीन अवताडे, सुरेखा गव्हाणे, सुनीता शेळके, नीलम खताळ यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

प्रास्ताविक नीलम खताळ यांनी केले. सूत्रसंचालन पूनम दायमा यांनी, तर आभार दीपली वाव्हळ यांनी मानले.

# धनगरवाडीच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी कोल्हे परिवाराची ५१ क्विंटल साखरेची सेवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे सद्गुरू योगीराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त दाखल होणाऱ्या वारकरी भाविकांच्या सेवेसाठी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ५१ क्विंटल साखरेची सेवा करण्यात आली. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे व माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी ही साखर सप्ताहस्थळी आणून पोहोच केली.

श्रीक्षेत्र धनगरवाडी व पंचक्रोशीमध्ये सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने वारकरी भाविक दाखल होत आहेत. सप्ताहाच्या कालावधीत भाविकांच्या भोजन व प्रसादाची व्यवस्था करण्यात येत असून, त्यासाठी विविध स्तरांतून सहकार्य केले जात आहे. याच उपक्रमाचा भाग




म्हणून कोल्हे परिवार आणि सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ५१ क्विंटल साखरेची सेवा करण्यात आली.

वारकरी भाविकांच्या सेवेसाठी दिलेल्या या योगदानाबद्दल सप्ताह समितीच्या वतीने आ. विवेकभैय्या कोल्हे, कोल्हे परिवार तसेच सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे जाहीर आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर बापू परजणे, संजीवनी कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते, पांडुरंग (शास्त्री) शिंदे, सतीश आव्हाड, गणेश सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन शिवाजीतात्या लहारे, माजी संचालक संजय शेळके, वाकडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनिल शेळके, भाजपाचे राजेंद्र लहारे, वाकडी सोसायटीचे माजी संचालक अशोक शेळके, ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब गोरे, सचिन आहेर, ॲड. बबलूदादा लहारे, सुभाष कापसे, डॉ. विजयराव आदी उपस्थित होते.

## द • ख • ल

### टाकळीमानुर तापले तापाने आरोग्य विभाग मात्र झोपलेला

**टाकळीमानुर :** पाथर्डी तालुक्याच्या पूर्वेला असणाऱ्या टाकळीमानुर अंबिकानगर चुंभळी मंचरवाडी गाडेवाडी तांबेवाडी तीनखडी या गावातील सध्या प्रत्येक कुटुंबातील सदस्य तापने फणफणला असूनपावसाळी आजाराने डोके वर काढले आहेतसर्दी खोकलाव प्रचंड ताप माझ् स्वरूपाच्या आजाराचे प्रकार असून आरोग्य विभाग मात्र अजूनही झोपलेलाच आहे गत पंधरा दिवसापासून या आजाराने परिसरातील खाजगी उपचारकेंद्रेदिवसभर गर्दीने फुललेली दिसतातमात्र आरोग्य विभागसर्व काही कागदावर मेळ घालत अलबेल असल्याचे भासवत कागदावरच सर्व काही गोष्टी केल्या जातातआणि उपकेंद्रात गेल्यानंतर ना त्यांच्याकडे औषधाची उपलब्धता आहे ना काहीउपचाराची साधने आहेत कागदावरील कामे करण्यातच त्यांचा वेळ जात आहे इकडे सात रोगाने प्रचंड गाव तापला असूनही आरोग्य विभाग मात्र झोपलेला आहेपावसाळ्यातील साथीची रोगांचे नियंत्रण करण्याची गरज असतानाहीसंपूर्ण परिसरात तापेच्या आजारानसंपूर्ण गावतापानेतापला असूनही अजून आरोग्य विभाग मात्र झोपलेलाचअसे तरी चित्र सध्या टाकळी मानूर आणि परिसरात दिसत आहेत.

### दिवसा दागिने पळवले

**तिसगाव :** तालुक्यातील मढी येथे रस्त्याने जाणाऱ्या मंदाबाई नानाभाऊ मरकड यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मनी मंगळसूत्र तोडून दोन चोरटे पसार झाले आहेत. मंदाबाई मरकड वय ६० या शुक्रवारी सकाळी चैतन्य नगर वस्तीवरून शेजारी त्यांच्या नातेवाईकांच्या वर्ष श्राद्धाच्या कार्यक्रमासाठी रस्त्याने चालल्या होत्या. यावेळी दोघेजण मोटरसायकलवर रस्त्याच्या कडेला उभे होते त्यांनी तोंडाला रुमाल बांधलेले होते. मरकड या रस्त्याने जात असताना त्यांच्या पाठीमागून येऊन मोटरसायकल वरील एक जण उतरला व आजी तुम्हाला कोठे जायचे आहे असे विचारले. त्याने लगेच गळ्यातील मनी मंगळसूत्र ओढण्यासाठी मरकड यांच्याकडे धाव घेतली मरकड खाली पडल्या गळ्यातील मनी मंगळसूत्र घेऊन हे दोघेजण मोटरसायकल घेऊन मढी गावच्या दिशेने पसार झाले. पोलिसांनी रस्त्यावरील चोरीचा गुन्हा दाखल करून घेतला आहे. मरकड यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे मणी मंगळसूत्र चोरून नेल्याने त्यांनी आयुष्यभर जपलेली त्यांची मनी मंगळसूत्राची भावनिक गुंतवणूक चोरट्यांनी चोरली आहे. चोरट्यांचा तपास लावण्याची मागणी मढी ग्रामस्थांनी केली आहे. मढी येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात प्रतेक अमस्येला व यात्रेला चोरट्याचा सर्रासपणे होणारा वावर आनेक महिलेचे गळ्यातील दागीन्यासह पैसे चोरीला जाण्याच्या घटना सर्वाधीक मढी येथे घडल्या आहेत त्यावर पोलीस प्रशासनाकडून उपाय योजना करण्याची मागणी मढी ग्रामस्थ व भाविकांमधून होत आहे.

### मोतीबिंदू शस्त्रक्रियेतून ज्येष्ठांच्या जीवनात पुन्हा प्रकाश



**अहिल्यानगर :** ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांच्या जीवनात आनंद आणि आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ नागरिक दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी मोफत नेत्र तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून पुणे येथून अहिल्यानगरमध्ये आलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे विशेष स्वागत करण्यात आले. समाजातील ज्येष्ठांचा सन्मान, त्यांच्या आरोग्याची काळजी आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम ठरला. फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ज्येष्ठ नागरिकांचे पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. सामाजिक बांधिलकी जपत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठांसाठी सातत्याने विविध आरोग्यविषयक आणि सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ही बाब लक्षात घेऊन फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी आणि आवश्यक असलेल्या ज्येष्ठ नागरिकांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

# डेंगूमुक्तीसाठी दिखाऊपणा नको, प्रत्यक्ष कृती करा : आयुक्त डांगे

## आशा सेविका व विद्यार्थिनींच्या पथनाट्यातून जनजागृती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत साप्ताहिक उपक्रमाचे आयोजन बालिकाश्रम रोड येथील माणिकताई करंदीकर शाळेत करण्यात आले. यावेळी आशा सेविका तसेच शाळेतील विद्यार्थिनींनी डेंगू आजाराबाबत जनजागृती करणारे प्रभावी पथनाट्य सादर करून नागरिकांना स्वच्छता व पाणी साठ्यांच्या व्यवस्थापनाचा संदेश दिला.

यावेळी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी घरोघरी जाऊन पाणी साठ्यांची तपासणी केली. नागरिकांनी डेंगूमुक्त अभियानात केवळ दिखाऊ सहभाग न घेता प्रत्यक्ष कृती करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महानगरपालिकेच्या वतीने शहरात गेल्या तीन वर्षांपासून डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान राबविले जात आहे. या अभियानाचा समाजामध्ये सकारात्मक परिणाम झाला आहे. पूर्वी शहरात डेंगूचे १०० ते १५० रुग्ण आढळत होते. मागील वर्षी ही संख्या २० ते २५ पर्यंत आली, तर यावर्षी आजअखेर केवळ पाच रुग्ण आढळले आहेत. पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीसाठे निर्माण होतात. हे पाणीसाठे उघडे राहिल्यास डासांची मादी त्यामध्ये अंडी घालते आणि त्यातून डासांची निर्मिती होते. कीटकांच्या जीवनचक्रात अंडी, अळी, कोष आणि प्रौढ डास अशा चार अवस्था असतात. डेंगूचा प्रसार करणाऱ्या डासांच्या अळ्या प्रामुख्याने स्वच्छ पाण्याच्या साठ्यांमध्ये तसेच फुलांच्या कुंड्यांमध्ये आढळतात. त्यामुळे घराभोवती असलेले पाणीसाठे नियमित तपासून ते रिकामे करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

करंदीकर कुटुंबाच्या सामाजिक कार्याचा उल्लेख आयुक्त डांगे यांनी यावेळी केला. यावेळी डॉ. नीरज करंदीकर, डॉ. अनिरुद्ध गीते यांनी मनोगत व्याक्त केले. डॉ. सृष्टी बनसोडे यांनी डेंगू आजारापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाच्या काळजीबाबत तसेच विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती उपस्थितांना दिली.



यावेळी आशा सेविका आणि माणिकताई करंदीकर शाळेतील विद्यार्थिनींनी डेंगू आजाराबाबत जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमास नगरसेविका शीतलताई ढोणे, डॉ. नीरज करंदीकर, डॉ. अनिरुद्ध गीते, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. दीप्ती करंदीकर, मुख्याध्यापक अनिल सुद्रिक, डॉ. वृषाली आरु, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. कंचन रच्चा यांच्यासह विद्यार्थी, पालक, महानगरपालिका अधिकारी, शिक्षकवृंद, आशा सेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्वकुळसाळी समाजाचे आद्यदैवत वेदमूर्ती भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव श्री जिव्हेश्वर भक्तसेवा मंडळ, सावेडी यांच्यावतीने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी गावडे मळा, पाईपलाईन रोड, सावेडी येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. जन्मोत्सवानिमित्त सकाळी ६ वाजता सुभाष पाठक व विठ्ठल बागडे यांच्या हस्ते भगवान श्री जिव्हेश्वर ग्रंथाचे वाचन होईल. त्यानंतर सौ. रमा झिकरे व श्री. ओमप्रकाश झिकरे यांच्या हस्ते पादुका अभिषेक संपन्न होणार आहे. भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, गीतपाळणा व इतर धार्मिक विधी श्री जिव्हेश्वर भक्तसेवा मंडळाच्या महिला विभागाच्यावतीने पार पडतील. पालखी पूजनानंतर भगवान श्री जिव्हेश्वरांची भव्य शोभायात्रा सावेडी परिसरातून काढण्यात येणार असून, बालगोपाळांच्या लेझीम पथकाचा सहभाग हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. त्यानंतर महिला विभाग व भजनी मंडळाच्यावतीने श्री जिव्हेश्वर भजनामृत व नामस्मरणाचा कार्यक्रम होणार असून, उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल. श्रावण शुद्ध त्रयोदशीला भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा करण्याची परंपरा स्वकुळसाळी समाजात अनेक वर्षांपासून जपली जात आहे. या उत्सवातून धार्मिक श्रद्धा, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला जातो.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात भव्य ग्रंथोत्सव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावी, वाचन संस्कृतीला चालना मिळावी आणि विद्यार्थी, पालक तसेच नागरिकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयात दोन दिवसीय भव्य ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २१ व २२ ऑगस्ट रोजी आयोजित या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन शेवगाव-पाथर्डीचे प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या हस्ते झाले.



यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते म्हणाले, पुस्तकांच्या वाचनातून व्यक्तीच्या विचारांची बैठक तयार होते. कोणतेही काम करताना विचारांना मोठे महत्त्व असते. प्रत्येकाने आयुष्यात एखादा छंद जोपासला पाहिजे. आपल्या आवडीचे काम अर्थार्जनाचे साधन बनविता आले तर जीवन अधिक समाधानी होते. यासाठी आवश्यक असलेली वैचारिक बैठक पुस्तकांच्या वाचनातून तयार होते. पुस्तक वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच विचारांची व्यापकता वाढते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले, आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगात वाचनाची सवय कमी होत असली, तरी बदलत्या काळात पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. माहितीच्या प्रचंड प्रवाहात विश्वासार्ह ज्ञान, चिंतनशील विचार आणि योग्य दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी पुस्तकांचे वाचन अधिक आवश्यक आहे. याच विचारातून बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने ग्रंथोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांसह पुस्तकप्रेमी नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक यांनीही बदलत्या पिढीच्या संदर्भात वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. आजची जेन-झी पिढी डिजिटल माध्यमांशी जोडलेली असली, तरी समाजाच्या विकासात तिची भूमिका महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतानाच या पिढीने पुस्तके, ज्ञान आणि वैचारिक साहित्याशी नाते जोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## शेवगावला एमआयडीसीसाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी सकारात्मक चर्चा : ॲड.काकडे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** तालुक्यातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि तालुक्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळावी, यासाठी शेवगाव येथे एमआयडीसी उभारण्याची मागणी सन २०२२ पासून सातत्याने करण्यात येत आहे. याच मागणीसाठी शिवसेनेचे प्रवक्ते संजिवजी भोर, ॲड. शिवाजीराव काकडे व सौ. हर्षदा काकडे यांनी मंगळवार, दि. १८ रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांची मंत्रालय, मुंबई येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी एमआयडीसीच्या निर्मितीबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांचेकडून सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आल्याची माहिती ॲड. शिवाजीराव काकडे यांनी आमचे प्रतिनिधींशी बोलतांना दिली.

शेवगाव शहरापासून जायकवाडी धरण जवळच असल्याने पाणीपुरवठ्याची तसेच वीज उपलब्धतेचीही सुविधा येथे होऊ शकते. त्यामुळे या ठिकाणी नगर दक्षिणेतील मोठी औद्योगिक वसाहत उभारण्याची मागणी शिवसेनेचे प्रवक्ते संजीवजी भोर व सौ.हर्षदा काकडे यांच्याकडून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व उद्योग मंत्री उदयजी सामंत साहेब यांच्याकडे करण्यात आली आहे.

शेवगाव तालुक्याने जायकवाडी धरणाच्या निर्मितीसाठी गोदावरी काठची २९ गावे दिली असून, या त्यागामुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नागरिक विस्थापित झालेले आहेत. त्यामुळे शेवगावला औद्योगिक विकासाच्या माध्यमातून न्याय मिळाल्यास येथील बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळेल.

## धनगरवाडीत घराच्या अंगणात गांजाची शेती

### एमआयडीसी पोलिसांची कारवाई सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** अहिल्यानगर तालुक्यातील धनगरवाडी येथे स्वतःच्या घरासमोरील अंगणात गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या एका इसमावर एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख २३ हजार ६५० रुपये किमतीचा तब्बल ६४.७३ किलोग्रॅम ओला गांजा जप्त केला असून आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे धनगरवाडी येथे आरोपी अनिल लक्ष्मण विरकर (वय ४९ वर्षे) याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी राहत्या घराच्या अंगणात आणि पायऱ्यांच्या जागेत गांजाच्या झाडांची लागवड केली होती. याबाबत माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे आणि पथकाने बुधवारी सायंकाळी घटनास्थळी धाड टाकली. या कारवाईदरम्यान पोलिसांनी अंगणातील गांजाची पाने, फांद्या व बोंडे असा एकूण ९ गोण्यांमध्ये भरलेला ६४.७३ किलोग्रॅम गांजा आणि मुद्देमाल ताब्यात घेतला. फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करून माल सील करण्यात आला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सुशांत सूर्यभान दिवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अनिल लक्ष्मण विरकर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला रात्री पावणेबाराच्या सुमारास अटक केली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे करत आहेत.

# आजार होण्यापूर्वी काळजी घेण्यासाठी आरोग्य शिबिरांची भूमिका महत्त्वाची : दिपाली ललवाणी

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोग तपासणी शिबिराला प्रतिसाद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** निरोगी व सदृढ समाजाचे स्वप्न घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. सेवाभावातून विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करून समाजातील गरजू घटकांना आरोग्यसेवेचा आधार देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला जात आहे. या सेवा कार्यात सहभागी होण्याची संधी व भाग्य मिळाले असून, आजार होण्यापूर्वी घेतलेली काळजी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे भविष्यातील गंभीर आजारांचा धोका टाळता येऊ शकतो. गरजू नागरिकांनी आरोग्य शिबिरांचा लाभ घेऊन भविष्यातील गंभीर आजार टाळण्यासाठी आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन दिपाली ललवाणी यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त प्रवरासंगम येथील अशोक सुवालाल ललवाणी



परिवाराच्या वतीने मोफत बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दिपाली ललवाणी बोलत होत्या. यावेळी सुमित ललवाणी, माईरा ललवाणी, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, वसंत चोपडा, बालरोगतज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, प्रवरासंगम येथील ललवाणी परिवार धार्मिक व सामाजिक कार्याशी जोडला गेला असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या विविध सेवा कार्यातही त्यांचे योगदान राहिले आहे. समाज निरोगी राहावा आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हॉस्पिटलच्या माध्यमातून मिशन म्हणून सेवा कार्य सुरू आहे. नवजात बालक हे देशाचे भविष्य असून, त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. नवजात बालकांसाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार आरोग्य सेवा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये एका छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहितीही डॉ. कटारिया यांनी दिली.

बालरोगतज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे यांनी सांगितले की, लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वित असून, तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम रुग्णसेवेसाठी कार्यरत आहे. २६ बेडच्या अद्ययावत एनआयसीयू विभागामध्ये नवजात बालकांच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच बालदमा, ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय अनुवंशिक आजार व जन्मजात आजारांचे निदान आणि उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स-रे, पॅथॉलॉजी लॅब आणि डायलिसिस मशीनद्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याचे डॉ. गुट्टे यांनी सांगितले. सध्या पावसाळ्यात व्हायरल आजारांचे प्रमाण वाढले असून, लहान बालकांच्या उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. दिपी अग्रवाल म्हणाल्या की, लहान बालकांचे लसीकरण हे भविष्यातील गंभीर आजार टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे पालकांनी जागरूक राहून बालकांचे वेळोवेळी व नियमित लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारचे लसीकरण उपलब्ध असून, ते अल्पदरात करून दिले जात आहे. बालकांच्या जीवनाची सुरुवात लसीकरणाने होते. भविष्यातील विविध आजारांना प्रतिबंध करण्याबरोबरच त्यांच्याविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे असल्याने पालकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अग्रवाल यांनी केले. या मोफत बालरोग तपासणी शिबिराला नागरिक व पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये एकूण ६५ बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ बालरोग डॉक्टरांकडून बालकांची तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार सतीश लोढा यांनी मानले.

### श्रेया डमाळे हिचे यश!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात कु. श्रेया डमाळे हिने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही श्रेयाने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून आपल्या गुणवत्तेची चमक दाखविली होती. श्रेया हिने या परीक्षेची तयारी करताना कोणत्याही शिकवणी वर्गाचे मार्गदर्शन न घेता केवळ स्वयंअध्ययनाच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या मेहनतीचे, सातत्यपूर्ण अभ्यासाचे आणि आत्मविश्वासाचे हे यशस्वी फलित आहे. कु. श्रेया ही निकमार विद्यापीठ, पुणे येथे परीक्षा नियंत्रणाची जबाबदारी सांभाळणारे डॉ. आदिनाथ डमाळे आणि वैशाली लोहे यांची कन्या आहे. श्रेयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक के. एल. वाकचौरे, अमृतकर, रणजीत खळे, महेश मोरे, डॉ. दादासाहेब करंजुळे यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### अहिल्यानगरमध्ये समाजकार्य महोत्सवाचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सीएसआरडी माजी विद्यार्थी संघ, अहिल्यानगर आणि इंटरनॅशनल जस्टिस मिशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता माउली सभागृह येथे समाजकार्य महोत्सव २०२६ आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय समाजकार्य सप्ताह तसेच वेठबिगारी प्रथा (निर्मूलन) कायदा, १९७६ च्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व भरीव योगदान देणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमात समाजकार्य क्षेत्रातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, व्यावसायिक समाजकार्यकर्ते, स्वयंसेवी व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, विकास क्षेत्रातील मान्यवर, विविध शासकीय व बिगरशासकीय यंत्रणांचे प्रतिनिधी तसेच समाजातील विविध घटक या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

समाजकार्य क्षेत्रातील विविध संस्था आणि कार्यकर्त्यांना एका व्यासपीठावर आणणे, त्यांच्या उल्लेखनीय कार्याची समाजाला ओळख करून देणे, अनुभव व अभिनव उपक्रमांची देवाणघेवाण करणे, परस्पर सहकार्याच्या संधी निर्माण करणे आणि समाजकार्याची व्याप्ती व सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणे हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश योगेश पैठणकर तसेच पद्मश्री पोपटराव पवार उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय भट्ट असणार आहेत. या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि भरीव कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये जेष्ठ सामजिक कार्यकर्ते ब्र. लेक्स गोन्साल्विस, ऐक्य सेवा सेंटरचे संस्थापक तुकाराम वाखारे, बीड येथील महिला बाल विकास विभागाचे कार्यकम अधिकारी मनोज ससे, दिव्यांग कल्याणाच्या क्षेत्रात कार्यरत असणारे अपंग सामाजिक विकास संस्थेचे संजय साळवे, शब्दगंध साहित्य परिषेदेचे संस्थापक सुनील गोसावी तसेच सामाजिक संस्था स्नेहालया, वॉटर, सोशल सेंटर, बोस्को ग्रामीण विकास केंद्र, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ, अल्कोहोलिक्स ॲकनॉनिमस, सेवाप्रीत, स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान, पोलीस अधीक्षक कार्यालयचे भरोसा सेल, न्यायाधार, ग्रामीण विकास केंद्र, बूथ हॉस्पिटल, युवान, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठान, सावली, हेल्पिंग हँड फाउंडेशन यांचा समावेश आहे.

## दखल

### भानुदास शिंदे यांची प्रकृती खालावली; प्रशासनाचा कानाडोळा

**दौंड :** शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते भानुदास शिंदे यांनी १६ ऑगस्टपासून सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. शुक्रवारी सकाळपासून त्यांची प्रकृती खालावल्याने आंदोलनस्थळी उपस्थित नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.



शिंदे यांची प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी त्यांना पाणी घेण्याचा आग्रह केला. यावेळी 'पाणी घ्या' अशा घोषणा देत नागरिकांनी त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी दहा मागण्यांची अंमलबजावणी झाल्याशिवाय आमरण उपोषण मागे घेणार नाही, अशी भूमिका भानुदास शिंदे यांनी कायम ठेवली आहे.

उपोषणस्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली असून शिंदे यांची प्रकृती खालावत असल्याने काही महिलांना अश्रू अनावर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रशासन आणि सरकारने उपोषणाची दखल घेऊन तातडीने मध्यस्थी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.दरम्यान, उपोषणाचा सातवा दिवस उजाडला तरी प्रशासन व सरकार या आंदोलनाकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शेतकरी व लोकहिताच्या दहा मागण्या मान्य करून त्याबाबत ठोस निर्णय घ्यावा; अन्यथा उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा इशारा भानुदास शिंदे यांनी दिला आहे. शिंदे यांच्या प्रकृतीला काही धोका निर्माण झाल्यास त्यास प्रशासन व सरकार जबाबदार राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

### अग्निशमन विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांच्या सेवांचा उपयोग करावा

**आळंदी :** आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागात दीर्घकाळापासून कंत्राटी पद्धतीने सेवा बजावणाऱ्या पात्र, प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांच्या सेवांचा योग्य प्रकारे उपयोग करून घ्यावा, अशी मागणी नगरसेवक हेमंत उर्फ सागर गुलाबराव कुऱ्हाडे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.आळंदी हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने वर्षभर भाविक व नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे अग्निशमन विभागाची सेवा २४ तास सक्षम आणि प्रभावी असणे आवश्यक आहे. विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडे आवश्यक प्रशिक्षणासह प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्याने त्यांच्या कौशल्याचा उपयोग नगरपरिषदेने करून घ्यावा, असे कुऱ्हाडे यांनी निवेदनात म्हटले आहे.शासन नियम, मंजूर आकृतिबंध आणि सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन राहून या कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरू ठेवण्याबाबत शक्यता तपासावी. मानधन तत्त्वावर सेवा घेणे किंवा शासन नियमांनुसार उपलब्ध अन्य पर्यायांचा विचार करून कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. हा विषय नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवून आवश्यक निर्णय घ्यावा. गरज भासल्यास शासन अथवा सक्षम प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करावा, अशीही मागणी कुऱ्हाडे यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाचे कामकाज सुरळीत व प्रभावी राहण्यासाठी या मागणीचा सकारात्मक विचार करून नियमानुसार कार्यवाही करावी, असे त्यांनी नमूद केले.

### मु. सा. काकडे महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' उत्साहात

**सोमेश्वरनगर :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मु. सा. काकडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर तिरंगा' उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सैनिकांनी देशासाठी केलेले बलिदान, शौर्य आणि देशसेवेची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सैन्यात भरती होऊन देशसेवा करावी, असे आवाहन केले. तसेच बारामती तालुक्यातील माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांच्या देशसेवेतील योगदानाचा गौरव करण्यात आला.

'नशामुक्त युवा–विकसित भारत' या संकल्पनेवर विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. तसेच सैनिक कल्याण संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत 'लष्करी जीवनाचा अनुभव' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. माजी सैनिकांनी सैनिकी जीवनातील अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना शिस्त, त्याग, राष्ट्रनिष्ठा आणि देशसेवेची प्रेरणा दिली.यावेळी सैनिक कल्याण संघाचे पदाधिकारी प्रकाश कुर्डे, प्रशांत शेंडकर, विजय गोलांडे व दिलीप गोलांडे उपस्थित होते. महाविद्यालयाचे सचिव सतीश लकडे, सी.डी.सी. अध्यक्ष अभिजीत काकडे–देशमुख आणि अध्यक्ष सतीशराव काकडे–देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

# पुण्यात बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांचा संताप

## जाचक अटींच्या शासन निर्णयाची समाजकल्याण कार्यालयासमोर जाहीर होळी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी पुकारलेले बेमुदत धरणे आंदोलन आता अधिक उग्र झाले आहे. 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'च्या नेतृत्वाखाली कालपासून पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयाबाहेर सुरू असलेल्या या आंदोलनात आज विद्यार्थ्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. शासनाने लागू केलेला २०२३ चा 'सर्वंकष समान धोरण' शासन निर्णय पूर्णपणे संविधानविरोधी असून यामुळे अनुसूचित जातींचा विशेष घटनात्मक दर्जा धोक्यात येत असल्याचा घणाघात करत विद्यार्थ्यांनी या अन्यायकारक जीआरची जाहीर होळी केली.



पीएच.डी. करणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठीच सरकारने या जाचक अटी लादल्या असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सामाजिक न्याय विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय टाळाटाळ केली जात आहे. बार्टीच्या माध्यमातून उच्चशिक्षण घेणाऱ्या ५८ जातींमधील विद्यार्थ्यांची संख्या केवळ १०० वर आणून सरकारने पीएच.डी. शिक्षणाचे केलेले 'रेशिनिंग' अत्यंत निंदनीय आहे, अशी तीव्र भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ही सरकारची दलितविरोधी मानसिकता स्पष्ट करते, अशी टीकाही यावेळी करण्यात आली.या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंबेडकरवादी चळवळीतील प्रमुख नेते राहुल डंबाळे, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. राहुल ससाणे, स्वप्निल नारबाग, राहुल नगटिळक, राजरत्न बलखांडे , सुरेखा वासनिक , नितीन आंधळे , मानसीताई वानखेडे , आदी मान्यवर आज सलग दुसऱ्या दिवशीही आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झाले होते. त्यांच्यासह राज्यभरातून आलेले शेकडो संशोधक विद्यार्थी या आंदोलनात ताकदीने उतरले आहेत. काल आंदोलनाच्या पहिल्या दिवशी बार्टीच्या निबंधक सुचिता शिंदे यांनी बार्टी कार्यालयात विद्यार्थी आणि मान्यवरांशी सविस्तर चर्चा केली होती. मात्र, ठोस तोडगा न निघाल्याने आज संतप्त विद्यार्थ्यांनी थेट शासन निर्णयाची होळी करून आपला लढा तीव्र केला. फेलोशिपची संख्या किमान ६०० करावी, वयोमर्यादा व लाभार्थी संख्येची अट तातडीने रद्द करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप द्यावी, या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार विद्यार्थी व मान्यवरांनी केला आहे.

## द्वारिका धाम टॉवर टी–५ सोसायटीच्या कारभाराची चौकशीचे आदेश

### उपनिबंधक कार्यालयाकडून कलम ८९ अन्वये अधिकृत तपासणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** टिळेकर नगर, कोंढवा बुद्रुक येथील द्वारिका धाम टॉवर टी–५ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कथित नियमबाह्य कारभाराबाबत करण्यात आलेल्या विविध तक्रारींची उपनिबंधक श्री. डी. एस. हौसारे यांनी दखल घेतली आहे. तक्रारींसोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे व उपलब्ध पुराव्यांची पडताळणी करून संस्थेच्या कामकाजाची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ८९ (अ) (१) अन्वये अधिकृत तपासणी व चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे तक्रारदारांकडून सांगण्यात आले.




सोसायटीमधील सध्याच्या कमिटीच्या स्थापनेबाबत तसेच तिच्या कार्यपद्धतीबाबत काही गंभीर आक्षेप उपस्थित करण्यात आले आहेत. मूळ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नसताना बँक खाते उघडणे, निवडणूक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीबाबत उपस्थित करण्यात आलेले प्रश्न, तसेच कमिटी स्थापन करण्यापूर्वी सोसायटीतील सभासदांना आवश्यक ती नोटीस देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात सोसायटीचे सभासद विजयसिंह गायकवाड यांनी उपनिबंधक कार्यालयाकडे वेळोवेळी विविध तक्रारी व अर्ज सादर केले होते. या तक्रारींच्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रे, पुरावे आणि संबंधित बाबींची पडताळणी करण्यात आल्यानंतर चौकशीचे आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

आता या अधिकृत तपासणीमध्ये कमिटीच्या कार्यकाळातील निर्णय, आर्थिक व्यवहार, प्रशासकीय कामकाज, कमिटी स्थापनेची प्रक्रिया आणि इतर नियमबाह्य असल्याचा आरोप करण्यात आलेल्या बाबींची तपासणी होणार आहे. त्यामुळे संबंधित कमिटीचा कारभार नियमांनुसार झाला आहे की नाही, तसेच तक्रारींमध्ये करण्यात आलेले आरोप कितपत तथ्यपूर्ण आहेत, हे चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, चौकशी पूर्ण होऊन अधिकृत निष्कर्ष समोर येईपर्यंत कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविणे योग्य ठरणार नाही. उपनिबंधक कार्यालयाच्या अधिकृत तपासणीतून वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा असून, चौकशीच्या निष्कर्षानंतरच पुढील कायदेशीर बाबी स्पष्ट होतील.

## जलसंधारण दिनानिमित्त 'महावॉकेथॉन रन फॉर वॉटर' उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** माती आणि पाण्याच्या संवर्धनाचे महत्त्व जनमानसात रुजवून जलसंधारणाची चळवळ लोकचळवळ बनविण्याच्या उद्देशाने जलसंधारण दिनानिमित्त आयोजित महा–वॉकेथॉन– रन फॉर वॉटर २०२६ ला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवाजीनगर येथील पोलीस परेड ग्राउंडपासून सुरू झालेल्या या वॉकेथॉनमध्ये नागरिक, विद्यार्थी, युवक, अधिकारी–कर्मचारी तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**माती–पाणी संवर्धनासाठी पुणेकरांचा उत्स्फूर्त सहभाग**

जल व्यवस्थापन, स्वच्छता समितीच्या सदस्या तथा जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचुंदकर, जिल्हा समाजकल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, प्रसिद्ध अभिनेत्री भार्गवी चिरमुले, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे कोषाध्यक्ष सुनील महाजन, मुख्य अभियंता नितीन दुसाने, अधीक्षक अभियंता चेतन कलशेट्टी, अधीक्षक अभियंता सुहास गायकवाड, कार्यकारी अभियंता गौरव बोरकर , कार्यकारी अभियंता दिपक लांडगे,अधिक्षक अभियंता गुण नियंत्रण सुहास गायकवाड, उप अभियंता सागर भोर, सुयश महाडीक, ज्ञानेश्वर उभे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. 'माती आणि पाणी वाचवा, भविष्यातील पिढी सुरक्षित करा' हा संदेश देत सकाळी सहा वाजता वॉकेथॉनला सुरुवात झाली. सहभागींच्या सुरक्षिततेसाठी मार्गावर पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, पिण्याचे पाणी, स्वच्छता व्यवस्था आणि आवश्यक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. नोंदणीकृत सहभागींसाठी टी–शर्ट, सहभाग चिन्ह तसेच कार्यक्रमानंतर नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. अभिनेत्री भार्गवी चिरमुले म्हणाल्या, माती आणि पाणी संवर्धन ही केवळ शासनाची किंवा एखाद्या विभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आधीच्या पिढ्यांनी माती आणि पाणी जपले म्हणून आज आपल्याला हिरवळ आणि निसर्ग अनुभवता येत आहे. पुढील पिढ्यांनाही हेच सुंदर पर्यावरण मिळावे यासाठी आपल्या पिढीने ठोस काम करण्याची गरज आहे. आजची वॉकेथॉन केवळ चालण्यापुरती मर्यादित नसून जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. सोशल मीडिया आणि रील्सच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविता येऊ शकतो. त्यामुळे जलसंधारण विभागाने अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन द्यावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी स्व. सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मृद व जलसंधारणाची शपथ घेतल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वॉकेथॉनला 'फ्लॅग ऑफ' करण्यात आला. सूत्रसंचालन आशिष जराड यांनी तर ऋतुजा ढगे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अवसरी खुर्द शासकीय महाविद्यालयात पाणीटंचाईने विद्यार्थिनींचे आंदोलन

### अखेर पाणीपुरवठा सुरळीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अवसरी खुर्द ता. आंबेगाव :** येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहात रविवार (दि. १६) पासून वापरासाठी पाणी उपलब्ध नसल्याने संतप्त विद्यार्थिनींनी गुरुवार (दि. २०) रोजी रात्री रिकाम्या बादल्या हातात घेऊन आंदोलन केले. आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने युद्धपातळीवर हालचाली करून शुक्रवारी (दि. २१) दुपारी पाणीपुरवठा सुरळीत केला.

महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहात चार इमारती असून, सुमारे २१९ विद्यार्थिनी वास्तव्यास आहेत. वसतिगृहाला दररोज दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, रविवारी सकाळपासून पाणीपुरवठा बंद झाला. यापूर्वीही पाणीपुरवठा अनियमित होत असल्याने विद्यार्थिनींना त्रास सहन करावा लागत होता. गुरुवारी टँकरच्या फेऱ्या उशिरा




अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींनी केलेले आंदोलन.

सुरू झाल्याने विद्यार्थिनींचा संयम सुटला. सायंकाळी सातच्या सुमारास विद्यार्थिनींनी रिकाम्या बादल्या हातात घेत तसेच विविध मागण्यांचे फलक घेऊन वसतिगृहासमोर ठिय्या आंदोलन केले. प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते. यावेळी पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले.

आश्वासनानंतर शुक्रवारी सकाळपासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकाने जेसीबी व १६ कामगारांच्या मदतीने वसतिगृहाकडे येणाऱ्या पाइपलाइनची तपासणी सुरू केली. पाच ठिकाणी खोदकाम करून पाइपलाइन तपासण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होऊन सुमारे १८ वर्षे झाली आहेत. चांडोली खुर्द येथील घोड नदीपासून महाविद्यालयापर्यंतची सुमारे आठ किलोमीटर लांबीची जलवाहिनी जुनी झाली आहे. त्यामुळे या जलवाहिनीचे सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार नवीन पाइपलाइन टाकण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम घोडेगावचे उपअभियता सूर्यकांत कुंभार यांनी दिली.

## होलार समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** राज्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त व सर्व सेवा सुविधा असणारे होलार समाज भवन बांधून देऊ व होलार समाज्याच्या विकासा साठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मुंबई येथे राष्ट्रीय होलार समाज संघ चे राष्ट्रीय नेते व राष्ट्रवादी काँग्रेस चे राज्य सरचिटणीस माणिकराव भंडगे व बारामती नगरपरिषद चे नगरसेवक गोरख पारसे यांच्या नेतृत्वाखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन होलार समाज्याच्या समस्या व ठाणे येथील शासकीय जागेवर होलार भवन बांधावे ज्या मुळे राज्यस्तरीय विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक,सांस्कृतिक कार्यक्रम घेता येतील व गरीब ,आर्थिक दृष्ट्या दुर्लक्ष राज्यातील होलार समाज्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा साठी अभ्यासिका या मध्ये करता येईल आशा विविध मागण्याचे निवेदन दिले.

या प्रसंगी चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिष्टमंडळाला होलार समाज्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले.या प्रसंगी पत्रकार सुरज देवकाते, संतोष जाधव, दीपक गुळवे ,बाळासाहेब जाधव, निवृत्ती गोरे, शेखर अहिवळे, नारायण ढोबळें,हिरामण माने, बालाजी गुळवे,आदी होलार समाज बांधव उपस्तीत होते होलार समाज आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आहे मुख्य प्रवाहात आणण्यासाठी होलार समाज भवन ही काळाची गरज असल्याचे नगरसेवक गोरख पारसे यांनी सांगितले.

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत प्रामाणिकपणा, शिस्त व संवेदनशीलता अंगीकारावी – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्वाला आकार देऊन अस्तित्वाला अर्थ देणारी प्रक्रिया आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविण्यासोबतच जिज्ञासा, चिकाटी आणि शिस्त या मूल्यांची जोपासना केली आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, शिस्त आणि कृतज्ञता हे गुण अंगीकारून त्यांना शिक्षण देणाऱ्या संस्था, शिक्षक आणि पालकांप्रती सदैव कृतज्ञ राहावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, मानद सचिव संदीप कदम, महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली नागवडे, सेवक सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, शिक्षणाशिवाय व्यक्तीच्या मूल्यांचा आणि संस्कारांचा विकास पूर्ण होऊ शकत नाही. शिक्षण माणसाला केवळ साक्षर करत नाही, तर सजग बनवून त्याला जगण्याचा व्यापक दृष्टिकोन देते. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक यशामागे त्यांची जिद्द, पालकांचा त्याग आणि शिक्षकांची दूरदृष्टी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ ही स्वर्गीय अजितदादांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असून महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाची संस्था आहे. संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. संस्थेला अधिक गती आणि योग्य दिशा देताना स्वर्गीय अजितदादांनी जपलेली पारदर्शकता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये पुढे नेण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असेही त्यांनी सांगितले.

संस्थेची प्रगती वेगाने साधण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करताना शिस्त आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. संस्थेत गैरवर्तन करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेबरोबरच संस्थात्मक शिस्त आणि जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.कार्यक्रमास संस्थेचे सभासद, शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरीपार्धीतील खड्ड्यांत नागरिकांनी केले वृक्षारोपण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** बोरीपार्धी ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांचा संयमाचा बांध फुटला आहे. रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी २० ऑगस्ट रोजी रेल्वे स्टेशनजवळील मारुती मंदिर चौकातील खड्ड्यांत वृक्षारोपण करून निषेध नोंदविला. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदन देत रस्ते तातडीने दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.

चौफुला पेट्रोल पंप, बोरमलनाथ मंदिर, रेल्वे गेट ते बोरीपार्धी गावठाण या मार्गासह गावातील अनेक रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत. अरुंद रस्ते आणि खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, यापूर्वी या मार्गावर अपघात होऊन नागरिक जखमी झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या मार्गावरून शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध, व्यापारी, शेतकरी व कामगार मोठ्या प्रमाणात ये–जा करतात. सततचा पाऊस आणि वाहनांची वर्दळ यामुळे खड्डे अधिक खोल व रुंद झाले आहेत. काही रस्त्यांची अनेक वर्षांपासून दुरुस्ती झालेली नसल्याने सणासुदीच्या काळात नागरिकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियममधील कलम ६१ अन्वये ग्रामपंचायत नारोडी ता. आंबेगाव जि. पुणे यांच्याकडुन पाणीपुरवठा (१ पद) कार्यक्षेत्रातील पात्र उमेदवारांकडुन दिनांक २२.०८.२०२६ ते ३०.०८.२०२६ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. यातुन ग्रामपंचायतीच्या नियमानुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.**

१. शैक्षणिक पात्रता १० वी पास.
२. कामाचे स्वरूप पाणीपुरवठा कर्मचा–यासाठी शासनाने व ग्रामपंचायतीने नेमुण दिलेली सर्व कामे.
३. वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे सर्व प्रवर्गासाठी.
४. उमेदवार गावातील रहिवासी असणे आवश्यक.
५. विहित नमुन्यातील अर्ज व अर्जासोबत सर्व कागदपत्रे साक्षांकीत असावी.
६. अर्जदारांची परीक्षा लेखी अथवा मुलाखत घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला असतील.
७. ग्रामपंचायतीचे ज्ञान व कामाचा अनुभव आवश्यक आहे.
८. संगणक ज्ञान असणे आवश्यक.
९. सदर पद नेमणुकीचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीला असतील.

सरपंच / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत नारोडी

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, प्रकाश माणकचंद खाबिया, राहणार आनंदनगर, गट नंबर २४६८/१/२४७०, फ्लॅट नंबर H- ३०७, आंबेठाण चौकाजवळ, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे – ४१०५०१.यांचे २७.०३.२०२६ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-14-EC- 4611 असे असून त्याचा इंजिन नंबर K10BN7295829, चासीस नंबर MA3EWDE1S00635037 असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती पद्मा प्रकाश खाबिया यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, आठ दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
दिनांक – २२/०८/२०२६

**श्रीमती पद्मा प्रकाश खाबिया**
**फ्लॅट नंबर अ ३०२,**
**रॉयल ऑरेंज काउंटी, फाउंटेन इन हॉटेल मागे,**
**शिवराज नगर, रहाटणी, पुणे – ४११०१७**

# यंदा कोरड्या दुष्काळाच्या छायेत बळीराजा

## शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती चिंताजनक

**दिपक खोसे । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शेतीप्रधान देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील बहुतांश ग्रामीण भागात यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू असूनही अडीच महिने उलटुनही अनेक ठिकाणी अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. काही भागांत पावसाच्या सरी येत असल्या तरी त्यामध्ये सातत्य नसल्याने पिकांना आवश्यक असलेला ओलावा जमिनीत टिकून राहत नाही. त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होत असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवरही त्याचा मोठा परिणाम होताना दिसत आहे.

सरकारच्या अच्छे दिनाच्या चर्चेत शेतकऱ्यांचा बळी अशी भावना आता ग्रामीण भागातून व्यक्त होऊ लागली आहे. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांसाठी अनेक आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्ष शेतीच्या बांधावर उभा राहिल्यावर बळीराजासमोरील अडचणी वेगळ्याच असल्याचे चित्र दिसते. एकीकडे पाऊस अनियमित, दुसरीकडे उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे आणि त्यात शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित दिवसेंदिवस कोलमडत चालले आहे.

**पावसाची अनिश्चितता ठरतेय मोठी समस्या**

शेतकऱ्यांसाठी पाऊस म्हणजे केवळ पाणी नसून संपूर्ण वर्षाच्या उत्पन्नाची आशा असते. पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर पावसाची भूमिका महत्त्वाची असते. मात्र यंदा पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.काही ठिकाणी पाऊस उशिरा झाला, तर काही भागात पाऊस झाल्यानंतर पुन्हा मोठा खंड पडत आहे. पावसामध्ये सातत्य नसल्याने जमिनीतील ओलावा कमी



होत आहे. विशेषतः हलक्या जमिनीतील पिकांवर याचा परिणाम अधिक जाणवत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला असून, पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**पिकांना बसतोय पाण्याचा ताण**

पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम होत आहे. कापूस, सोयाबीन, तूर, कांदा तसेच विविध फळपिकांना योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी मिळणे आवश्यक असते. मात्र पावसाची अनिश्चितता आणि उपलब्ध पाण्याची मर्यादित साधने यामुळे शेतकऱ्यांसमोर पिके वाचविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.ज्यांच्याकडे

### पावसाची अनियमितता, पिकांना ताण आणि शेतमालाला अपेक्षित भाव नसल्याने बळीराजाचे आर्थिक गणित कोलमडले

विहीर, बोअरवेल किंवा इतर सिंचनाची सुविधा आहे, ते शेतकरी उपलब्ध पाण्यावर पिके वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र त्यासाठी वीज, मोटार, ठिबक, पाइपलाइन आणि पाण्याचा खर्च करावा लागत आहे. त्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा नाही, अशा शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक गंभीर आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसमोर पावसाचा मोठा प्रश्न निर्माण झाला तर संपूर्ण हंगामाचे अर्थिक गणिते कोलमडणार आहेत.

**उत्पादन खर्च वाढला; उत्पन्न मात्र अनिश्चित.**

शेतीचा खर्च वर्षानुवर्षे वाढत आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, मजुरी, मशागत, डिझेल, वीज, पाणी आणि वाहतूक या सर्व बाबींवर शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो.पेरणीच्या वेळी शेतकऱ्याने हजारो रुपये खर्च केलेले असतात. त्यानंतर पिकाची वाढ चांगली व्हावी म्हणून खतांची मात्रा, फवारण्या आणि आंतर मशागत यावर पुन्हा खर्च करावा लागतो. मात्र शेवटी उत्पादन किती मिळेल आणि त्याला बाजारात किती भाव मिळेल, याची खात्री नसते. खर्च निश्चित आणि उत्पन्न अनिश्चित, अशी परिस्थिती शेती व्यवसायासमोर निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी कर्ज काढून शेतीचा खर्च भागवत आहेत. परंतु पीक हातात येण्यापूर्वीच पावसाने साथ सोडली किंवा बाजारभाव घसरला तर कर्ज फेडणेही कठीण होते.

**शासकीय हमीभाव कागदावरच शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याची खंत.**

शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटामागे केवळ पाऊस हे एकमेव कारण नाही. शेतमालाला योग्य आणि हमीभाव **मिळणे ही देखील मोठी समस्या आहे.**

## द•ख•ल



### विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही काळाची गरज : गायकवाड

**शेवगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज सामाजिक चळवळी नामशेष होण्याच्या मार्गावर असून त्याचा गैरफायदा घेत धर्मांध संघटना अत्यंत सूक्ष्म योजनेनुसार तरुणांमध्ये विषारी विचार रुजवून त्यांचे डोके भडकवण्याचे मनसुबे आखत आहेत. अशा कठीण काळात तरुणांना विवेकी विचार, आचार आणि अहिंसात्मक संघर्षाच्या मार्गाने जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी 'अंनिस' गेली ३७ वर्षे अविरत प्रबोधन करत आहे. अंधश्रद्धेच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत, अनेक विचारप्रवर्तक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील गैरसमज दूर केले. केवळ अंधविश्वास न ठेवता प्रत्येक गोष्टीमागील वैज्ञानिक कारण समजून घेतले पाहिजे, संतांचा आणि समाजसुधारकांचा वैचारिक वारसा पुढे चालवण्यासाठी समाजाने हातात हात घालून काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुकळे पी. ए. यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना उपदेश केला की, विद्यार्थ्यांनी कोणत्याही भ्रामक कल्पनांना किंवा अंधश्रद्धेला बळी न पडता समाजात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. या प्रसंगी बबनराव धावणे, चिमाजी धनवडे, डॉ. गणेश चेके, वसंत जगधणे, प्रमोद लांडे, धोंडीराम बर्डे हे व्यासपीठावर उपस्थित होते.



### करीम शेखचे एमपीएससी परीक्षेत यश

**राशीन :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून राज्य कर निरीक्षक पदावर निवड झाल्याबद्दल श्री जगदंबा विद्यालयाचा माजी विद्यार्थी करीम शेख यांचा विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. करीम शेख यांच्या या घवघवीत यशामुळे श्री जगदंबा विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, माजी विद्यार्थ्याने स्पर्धा परीक्षेत यश मिळवत शासकीय सेवेत प्रवेश मिळवल्याने विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सत्कार समारंभातून विद्यार्थ्यांना करीम शेख यांच्या संघर्षमय यशाची प्रेरणा मिळाली. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आपले ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्य, मेहनत व आत्मविश्वास कायम ठेवावा, असा संदेश या प्रसंगी देण्यात आला.

# नम्रता पतसंस्थेतील कथित बोगस कर्जप्रकरणाचा गदारोळ!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### न्यायालयीन आदेशानंतरही बोजा कायम

**राशीन :** राशीन येथील नम्रता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेतील कथित बोगस कर्जप्रकरणाने पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली आहे. कर्जदार व जामीनदारांच्या नावांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था विभाग, कर्जत यांच्याकडे करण्यात आली आहे.

निवेदनात एस.सी.सी. क्र. २४/२०१३ या न्यायालयीन प्रकरणाचा संदर्भ देण्यात आला असून, ३१ ऑगस्ट २०१३ रोजीच्या न्यायालयीन आदेशानंतरही संबंधित मिळकतीवरील बोजा कायम असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विजयसिंग भारतसिंग तानुसिंग परदेशी यांच्या अस्तित्वाबाबतही निवेदनकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

**कर्ज कागदपत्रांची सखोल तपासणी करण्याची मागणी**

कर्जप्रकरणातील कागदपत्रे, सह्या, ओळखपत्रे, जामीनदारांची कागदपत्रे तसेच पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या कार्यवाहीची सखोल तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच न्यायालयीन आदेशाचा विचार करून संबंधित मिळकतीवरील कथित बेकायदेशीर बोजा कमी करण्यासाठी तातडीने कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**सात दिवसांत कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा**

या प्रकरणात चौकशीत दोषी आढळणारे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सहकारी कायदा व फौजदारी कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने सात दिवसांत योग्य ती कार्यवाही न केल्यास सहाय्यक निबंधक कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्याचा इशारा तक्रारदार. भगतसिंग तान्हुसिंग परदेशी यांनी दिला आहे. दरम्यान, सदर प्रकरणातील आरोप हे तक्रारदार व निवेदनकर्त्यांनी केलेले असून, त्यांची सत्यता अधिकृत चौकशी व संबंधित कागदपत्रांच्या तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सहकार विभाग या तक्रारीची दखल घेऊन नेमकी कोणती कारवाई होते, याकडे राशीन परिसराचे लक्ष लागले आहे.

# अवैध दारू विक्रीचा बंदोबस्त करा

### हातगावच्या ग्रामसभेत एकमुखी ठराव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे गेली अनेक महिन्यापासून राजरोसपणे शेवगाव - कांबी व पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर असणाऱ्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकासह इतरत्रही अवैध रित्या देशी दारूची दिवसा - ढवळ्या सुरू असून या विक्रीमुळे गावालगतच असणाऱ्या श्री रामेश्वरदास विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गालगतच असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना व कर्मचाऱ्यांना त्याचा सतत मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्यामुळे गावात ज्या - ज्या ठिकाणी दारूची विक्री होत आहे ती तात्काळ बंद करण्यात यावी असा एकमुखी ठराव स्वातंत्र्यदिनानिमित्त घेण्यात आलेल्या ग्रामसभेत घेण्यात आला आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक अरुण मातंग हे होते. तसेच खानदेश मधील जळगाव जिल्ह्यात ग्रामसभेत जो प्रकार घडला त्या प्रकारामुळे राज्यातील ग्रामसेवक संघटनेने ग्रामसभेमध्ये सचिव म्हणून काम न करण्याचा जो बहिष्कार टाकला त्यामुळे येथील ग्रामविकासअधिकारी संजय दारूणकर यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतल्यामुळे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम याची ग्रामसभेसाठी सचिव म्हणून नेमणूक करण्यात येऊन सभा घेण्यात आली आहे. या सभेत विषय पत्रिकेवरील सर्वच्या सर्व २८ विषयांचे वाचन प्रशासक मातंग यांनी केले असून एक - एक विषय हाताळण्यात आला असून जिल्हा व तालुकास्तरावरून गावातील ३०९ घरकुलांना ग्रामस्थांच्या नावे जी मंजुरी मिळाली आहे त्याचेही वाचन करण्यात आले असून त्या व्यतिरिक्त इतरही प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर ऐन वेळी येणाऱ्या विषयामध्ये मातंग यांनी गावातील अवैध रित्या विक्री होणाऱ्या दारूवर बंदी होण्यासाठी विषय मांडला असता त्यास उपस्थित सर्वच ग्रामस्थानी मंजुरी दिली असल्याने सर्वानुमते तो ठराव एकमताने पास केला आहे.

# मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत मनिष म्हस्के याला विशेष प्राविण्य पदक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** काही महिन्यापूर्वी झालेल्या राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध सामान्य ज्ञान परीक्षेत शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांबी चा इयत्ता पहिली चा विद्यार्थी मनिष निशिकांत म्हस्के याने मंथन प्रज्ञाशोध सामान्य ज्ञान परीक्षेत विशेष प्राविण्य पदक मिळवले या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.या यशाबद्दल शाळेच्या वतीने व विश्वासनंद सेवा समितीच्या व तसेच ग्रामपंचायत कांबी यांच्यावतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मनीष निशिकांत म्हस्के व पालक सुरेश म्हस्के यांचा सन्मान करण्यात आला या वेळी गावचे प्रशासक तथा उपसरपंच बाबासाहेब मगर शाळा समितीचे अध्यक्ष सोमनाथ म्हस्के व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अतुल थोरात विश्वासनंद सेवा समितीचे इसाक भाई शेख मंगरूळ शाळेचे शिक्षक सुरेश पवार कांबी गावचे प्रसिद्ध किराणा व्यापारी रतन कुऱ्हे, प्रमोद नरके,शाळेचे मुख्याध्यापक सुखदेव डेंगळे, शिक्षक सुहास वाकळे, रविंद गरड. बाबासाहेब लासे सुधीर शेळके रोहिदास बडे वर्गशिक्षिका सारिका दौंड आदी उपस्थित होते. यापूर्वीही शाळेने तालुका जिल्हा व राज्य पातळीवर चमकदार कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांना मिळत असलेले दर्जेदार शिक्षणामुळे गावातील पालकांचा ओढा जिल्हा परिषद शाळा कडे वाढत चालला आहे. नुकत्याच मंथन परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकाचे ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# पारनेर शहरात 'हर घर तिरंगा' व 'स्वच्छता पंधरवडा' निमित्त भव्य रॅली ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पारनेर :** महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर शहरामध्ये हर घर तिरंगा आणि स्वच्छता पंधरवडा २०२६ चे औचित्य साधून भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भारत माता की जय आणि स्वच्छता हीच ईश्वरसेवा अशा स्वच्छताविषयक घोषणांनी पारनेर शहराचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमात विद्यार्थ्यांसोबतच स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रॅलीदरम्यान रा.से.यो. स्वयंसेवक आणि एनसीसीच्या कॅडेट्सनी हातात विविध संदेश देणारे फलक धरून नागरिकांना तिरंग्याचा सन्मान, देशभक्ती आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी देशप्रेम आणि देशसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, 'हर घर तिरंगा' उपक्रम प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्र अभिमान जागवणारा आहे. त्याचप्रमाणे 'स्वच्छता पंधरवडा २०२६' च्या संदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, स्वच्छता ही केवळ १५ दिवसांच्या उपक्रमापुरती मर्यादित न राहता ती आपल्या आणि आपल्या आसपासच्या सर्व नागरिकांच्या सवयीचा भाग झाली पाहिजे. तरच आपले व समाजाचे आरोग्य अबाधित राहील. स्वच्छता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याशिवाय महात्मा गांधीजी, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही. यासाठी सर्वांनी मिळून प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

स्वच्छता पंधरवड्यांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदानातून स्वच्छतेचा संदेश दिला. रा.से.यो. स्वयंसेवकांनी पारनेर मध्यवर्ती बसस्थानक परिसर आणि महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. याशिवाय, स्वयंसेवकांनी पारनेर शहरातील रहिवासी भागात दारोदार जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत प्रभावी जनजागृती केली.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, लेफ्टनंट भरत डगळे, कार्यालयीन अधीक्षक श्री. बाळासाहेब गिरी, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे यांच्यासह विविध विभागांतील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलवंडीतील बिंगो-मटक्यावर धाड

### गुन्हा दाखल न झाल्याने प्रश्नचिन्ह - कारवाई की 'हप्ता' वसुली?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** बेलवंडी पोलीस ठाण्यापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर सुरू असल्याचा आरोप असलेल्या बिंगो-मटका अड्ड्यावर बेलवंडी पोलीस कर्मचारी यांनी धाड टाकल्याचे समोर आले आहे. मात्र, घटनास्थळी पाहणी व व्हिडिओ रेकॉर्डिंग झाल्याचे दिसत असतानाही संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर न आल्याने पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये बिंगो-मटक्यासदृश प्रकार सुरू असल्याचे दिसत असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे



पंचनामा झाला का? साहित्य अथवा रोख रक्कम जप्त केली का? उपस्थितांची चौकशी झाली का? आणि गुन्हा दाखल का झाला नाही? असे सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

**'हप्ता'च्या चर्चेने खळबळ**

दरम्यान, पोलिसांची ही धाड कारवाईसाठी होती की कथित 'हप्ता' वसुलीसाठी, अशी चर्चा परिसरात सुरू झाली आहे. हप्ता न दिल्याने धंदा बंद करण्यास सांगितल्याचीही चर्चा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हप्ता मागितल्याचा किंवा घेतल्याचा कोणताही अधिकृत पुरावा सध्या समोर आलेला नाही. त्यामुळे या आरोपांची सत्यता चौकशीतून स्पष्ट होणे गरजेचे आहे.

**कारवाईवर उपस्थित होणारे सवाल**

- बिंगो अड्ड्यावर धाड टाकल्यानंतर गुन्हा दाखल का झाला नाही?
- पंचनामा व जप्तीची नोंद करण्यात आली का?
- घटनास्थळी उपस्थित व्यक्तींची चौकशी झाली का?
- स्टेशन डायरीत या कारवाईची नोंद आहे का?
- जुगार सुरू होता तर कायदेशीर कारवाई का नाही?
- जुगार नव्हता तर पोलिसांच्या व्हिडिओतील दृश्यांचे स्पष्टीकरण काय?
- कथित 'हप्ता'च्या चर्चेची वरिष्ठांकडून चौकशी होणार का?

**मागील वादाचीही चर्चा**

यापूर्वी एका महिला पोलीस कर्मचाऱ्याचा कथित अवैध धंद्यांशी संबंधित व्यक्तींसोबत वाढदिवस साजरा करतानाचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यावरूनही चर्चा झाली होती. आता पुन्हा त्याच कर्मचाऱ्याचे नाव या प्रकरणात आल्याने वरिष्ठ पोलीस प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची व्हिडिओ, स्टेशन डायरी, पंचनामा व कायदेशीर कारवाईच्या नोंदी तपासून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का या प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करणार, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सवापूर्वी उघडी गटार बंद करा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** शेवगाव शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मोठी उघडी गटार पाईप टाकून कायमस्वरूपी बंद करून चौक वाहतुकीसाठी अधिक प्रशस्त करावा, अशी मागणी छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळाच्या वतीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

नगरपरिषदेने चौकातील गटारीच्या आजूबाजूचे अतिक्रमण काढले आहे. मात्र, गटार अद्याप उघडी असल्याने उपलब्ध रस्ता मोठ्या प्रमाणात व्यापला जात असून नागरिक तसेच वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे योग्य क्षमतेची पाईप टाकून गटार बंद करावी आणि त्यावर आवश्यकतेनुसार रस्ता विकसित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

येत्या काही दिवसांत गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. शेवगावच्या पेठ परिसरात गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असते. गणेश विसर्जनाच्या दिवशी मानाच्या गणपतींसह विविध गणेश मंडळांच्या भव्य मिरवणुका निघतात. यामध्ये ढोल पथक, झांज पथक, लेझीम पथक यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

छत्रपती शिवाजी महाराज चौक प्रशस्त झाल्यास गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान विविध मंडळांना ढोल-झांज व लेझीमचे डाव अधिक व्यवस्थितपणे सादर करता येतील. त्यामुळे मिरवणुकीला अधिक भव्यता प्राप्त होण्याबरोबरच नागरिकांनाही सुरक्षितपणे मिरवणुकीचा आनंद घेता येईल, असे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. नीरज लांडे, बंडूशेठ रासने, दत्तात्रय फुंदे, किरण काथवटे, दीपक पाथरकर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते. नगरपरिषदेने दोन्ही बाबींची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून गणेशोत्सवापूर्वी गटार बंद करण्याचे काम पूर्ण करावे आणि जनता व्यासपीठाचे मैदान सण-उत्सवांसाठी खुले करून द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री









# ७ सप्टेंबरची 'डेडलाइन'

**मकोका न झाल्यास आमदारांसह उपोषण**

**पालकमंत्री विखे यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन स्थगित**



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (मकोका) कायद्यांतर्गत कारवाई करावी, या मागणीसाठी गेल्या सात दिवसांपासून महात्मा गांधी चौकात सुरू असलेल्या दुबैय्या कुटुंबीयांच्या धरणे आंदोलनाची शुक्रवारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर सांगता झाली. मात्र, ७ सप्टेंबरपर्यंत मकोकाची कारवाई न झाल्यास आमदार हेमंत ओगले यांच्यासह नागरिक उपोषणाला बसतील, असा स्पष्ट इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

आकाश दुबैय्या यांची ११ जुलै रोजी श्रीरामपूर येथील त्यांच्या हॉटेलमध्ये निर्घृण हत्या झाली होती. या प्रकरणातील सर्व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, हत्येच्या कटामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्याचाही आरोपी म्हणून समावेश करावा, आरोपींच्या टोळीवर मकोका लावावा आणि तपासाला गती द्यावी, या मागण्यांसाठी चंद्रशेखर नारायण वेंकटरमन (दुबैय्या) यांच्या नेतृत्वाखाली कुटुंबीयांनी १५ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.

दरम्यान, १९ ऑगस्ट रोजी कुटुंबीयांनी श्रीरामपूर शहर पोलिसांना निवेदन देऊन मकोका कारवाईची मागणी केली होती. पोलिस प्रशासनाने संघटित गुन्हेगारीविरोधात कायदेशीर प्रक्रियेला सुरुवात केल्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र, दिलेल्या मुदतीत मकोका कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे आता पोलिस प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे श्रीरामपूरकरांचे लक्ष लागले आहे.

यावेळी अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलिस उपअधीक्षक जयदत्त भवर, पोलिस निरीक्षक विशाल खैरे, आमदार हेमंत ओगले, शिवसेना नेते प्रकाश चित्ते, नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यासह विविध पदाधिकारी, दुबैय्या कुटुंबीय व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विखे पाटील यांच्या मध्यस्थीने आंदोलन स्थगित

शुक्रवारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन दुबैय्या कुटुंबीयांशी चर्चा केली. हत्येचा तपास योग्य दिशेने सुरू असून कायद्याच्या चौकटीत आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या विनंतीनंतर कुटुंबीयांनी आंदोलन स्थगित केले. पालकमंत्र्यांच्या हस्ते पाणी स्वीकारून आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# नशामुक्त श्रीरामपूरसाठी १० हजार विद्यार्थ्यांचा एल्गार

**पालकमंत्री विद्यार्थ्यांसोबत रॅलीत सहभागी**



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** :'व्यसनमुक्त युवक हीच सशक्त समाजाची खरी ताकद' हा संदेश देत श्रीरामपूर शहरात गुरुवारी तब्बल १० हजार विद्यार्थ्यांनी नशामुक्तीसाठी एल्गार पुकारला. श्रीरामपूर पोलिस विभागाच्या वतीने अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या संकल्पनेतून आयोजित पाच दिवसीय 'नशामुक्त अभियानाचा' समारोप आर.बी.एन.बी. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झाला.

यानिमित्त काढण्यात आलेल्या सुमारे चार किलोमीटरच्या जनजागृती रॅलीत ३५ शाळा व २० महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले. विशेष म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत पायी चालत रॅलीत सहभाग घेतला. नशामुक्तीच्या घोषणा देत त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून नशामुक्त श्रीरामपूर घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन विखे पाटील यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नशामुक्ती अभियानाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम राबविण्यात आला. अभियानादरम्यान निबंध, वक्तृत्व, चित्रकला, रांगोळी व घोषवाक्य स्पर्धांसह पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. अहिल्यानगर पोलिस बॅण्ड पथकाने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून रॅलीत उत्साह निर्माण केला. शहरातील प्रमुख मार्गांवरून गेलेल्या रॅलीत विद्यार्थ्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

नागरिकांनीही रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत केले. यावेळी आ. हेमंत ओगले, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, पोलिस उपअधीक्षक जयदत्त भवर, गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे, गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन, पोलिस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पोलिस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ दिली.

# शनिशिंगणापूर परिसरात गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

**कट्टा विक्रीचा प्रयत्न स्थानिक गुन्हे शाखेने उधळला**



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर परिसरात गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसांची विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. अनिल सिताराम सावंत (वय ३०, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा आणि दोन हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे, असा एकूण ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे व पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, अशोक लिपणे, भगवान सानप, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड व महादेव भांड यांचे पथक तयार करण्यात आले होते. २० ऑगस्ट रोजी हे पथक शनिशिंगणापूर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय बातमीदारामार्फत सावंत याच्याकडे गावठी कट्टा असून तो विक्री करण्यासाठी हॉटेल ब्लू ऑरगॅनिक रसवंती सेंटरजवळ आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने पंचांसमक्ष कारवाई करून सावंत याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. जप्त केलेल्या शस्त्रांबाबत अधिक चौकशी केली असता सदर गावठी कट्टा व काडतुसे गणेश शहाराम शिंदे (रा. वळणपिंप्री, ता. राहुरी) याच्याकडून विकत घेतल्याचे सावंत याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणातील गणेश शिंदे हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे. याप्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासन करीत आहे.

# दशक्रियेसाठी आलेल्या नातेवाईक महिलेचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवारानगर /झरेकाठी** : एका नातेवाईकाच्या दशक्रिया विधीसाठी मदतीला आलेल्या कुटुंबावर नियतीने आणखी एक दुःखद आघात केला. विधीच्या तयारीत सहभागी झालेल्या ६० वर्षीय ललिता सुनील थेटे (रा. भगवतीपूर, प्रवरानगर) यांचा विद्युत तारेचा तीव्र धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. मंगळवारी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. धांदरफळ बुद्रुक येथील तोरकडी कुटुंबातील नातेवाईकाच्या दशक्रिया विधीसाठी थेटे या तीन-चार दिवसांपूर्वीच आल्या होत्या. बुधवारी होणाऱ्या विधीच्या तयारीत दिवसभर मदत केल्यानंतर रात्री त्या इतर नातेवाईकांसोबत गप्पा मारत होत्या. दरम्यान, कांद्याच्या चाळीत कुत्रे-मांजरी जाऊ नयेत म्हणून लोखंडी दरवाजा लावण्यासाठी त्या गेल्या. दरवाजाजवळील विद्युत तार लोखंडी कुंपणाच्या संपर्कात आली होती. परिसरात ओलावा असल्याने दरवाजाला हात लावताच थेटे यांना जोरदार विजेचा धक्का बसला. काही मिनिटांतच त्या जागीच कोसळल्या. जवळ असलेल्या नातेवाईकांनी धाव घेत लाकडाच्या साहाय्याने त्यांना विद्युत प्रवाहापासून बाजूला केले. सुरुवातीला सर्पदंशाचा संशय व्यक्त झाला; मात्र त्यानंतर त्यांना तातडीने घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दशक्रिया विधीसाठी एकत्र आलेल्या कुटुंबावर ओढवलेल्या या दुहेरी दुःखामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# बाभळेश्वरमध्ये पाण्याच्या टाकीत पडलेल्या बिबट्याचा यशस्वी रेस्क्यू



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील बाभळेश्वर येथील श्रीरामपूर जिल्हा दूध संघाच्या आवारातील पाण्याच्या टाकीत पडलेल्या बिबट्याची वनविभाग, प्राणीमित्र आणि पोलिसांच्या तत्परतेने सुखरूप सुटका करण्यात आली. टाकीत सुमारे दोन फूट पाणी असल्याने बिबट्याने रात्रभर त्याच अवस्थेत काढली. शुक्रवारी सकाळी बिबट्याच्या डरकाळ्यांचा आवाज ऐकू आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. श्रीरामपूर जिल्हा दूध संघालगतच्या शेतकऱ्यांना सकाळी पाण्याच्या टाकीतून बिबट्याच्या डरकाळ्या ऐकू आल्या.

पाहणी केली असता टाकीत बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. योगेश म्हस्के यांनी तातडीने वनविभागाला माहिती दिली. पत्रकार शहाजीराजे दिघे यांनीही मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के तसेच वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. यानंतर विकास म्हस्के यांनी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक उपवनसंरक्षक गणेश मिसाळ आणि कोपरगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी मेहबूब शेख यांना माहिती दिली.

वनपरिक्षेत्र अधिकारी मेहबूब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणीमित्र विकास म्हस्के, वनरक्षक प्रतीक गजेवर, अक्षय बडे, मेजर विलास डगळे, राहुल कानडे व चालक मंजाबापू खेमनर यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, बिबट्याच्या रेस्क्यूची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. त्यामुळे मोहिमेत अडथळा निर्माण होऊ नये म्हणून लोणी पोलिस ठाण्याचे पीएसआय आशिष चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी गर्दी हटवून वनपथकाला सहकार्य केले.

रेस्क्यू मोहीम यशस्वी झाल्यानंतर श्रीरामपूर जिल्हा दूध संघाचे जनरल मॅनेजर बबनराव चव्हाण व योगेश म्हस्के यांनी वनपथकाचा सत्कार केला. दूध संघाचे चेअरमन सुधीर म्हस्के यांनी वनविभागाच्या तत्परतेबद्दल आभार मानले. दरम्यान, पाण्याची टाकी खुली असल्याने बिबट्या त्यात पडल्याचे स्पष्ट झाले. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी खुल्या पाण्याच्या टाक्यांना सुरक्षा व्यवस्था करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली. वनविभाग, प्राणीमित्र आणि पोलिसांच्या समन्वयामुळे बिबट्याची सुखरूप सुटका झाल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

### पिंजरा टाकताच बिबट्याचा प्रवेश

रात्रभर पाण्यात राहिल्याने बिबट्या मोठ्या प्रमाणात थकला होता. वनपथकाने नियोजनपूर्वक पिंजरा टाकीत सोडला. पिंजरा दिसताच बिबट्याने त्यात प्रवेश केला. त्यानंतर पिंजऱ्यासह बिबट्याला सुरक्षितपणे टाकीतून बाहेर काढण्यात आले. या रेस्क्यूदरम्यान बिबट्याला कोणतीही इजा झाली नाही.

# लोहारवाडी शिवारात एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील चांदा जवळील लोहारवाडी शिवारात नानासाहेब वेणूनाथ पेहेरे (वय ४० रा. रांजणगाव देवी ता. नेवासा) येथील रहिवासी लोहारवाडी शिवारात लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना काल घडली. या आत्महत्याचे कारण आद्यपही समजले नाही. या घटनेची खबर जालिंदर सूर्यभान तुपे रा. चांदा -घोडेगाव रोड यांनी दिली. यां घटनेची नोद सोनई पोलीस ठाण्यात ५५/२०२६ नुसार कलम १९४ नुसार करण्यात आली आहे. अधिक तपास प्रभारी सपोनि विजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार एम आर आडकीत्ते करत आहे.

# महामार्ग भूसंपादनाच्या निवाड्यांना उच्च न्यायालयाची स्थगिती

**शेतकऱ्यांना वाढीव मोबदल्याचा मार्ग मोकळा; प्रशासनाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह**



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सुरत-नाशिक-अहिल्यानगर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गासाठी संगमनेर तालुक्यातील वडझरी बु., तळेगाव, जुनेगाव, शहादतपूर, मिरपूर, वडझरी खु. आदी गावांतील संपादित जमिनींच्या मोबदल्याबाबत प्रशासनाने जाहीर केलेल्या अंतिम निवाड्यांना मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने संबंधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चुकीच्या पद्धतीने बाजारमूल्य निश्चित करून शेतकऱ्यांना कमी मोबदला देण्यात आल्याचा आरोप करत दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकांनंतर हा निर्णय झाला आहे.

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम ३(जी) अन्वये भूसंपादन अधिकाऱ्यांनी १७ मार्च २०२६ रोजी संबंधित गावांसाठी अंतिम निवाडे घोषित केले होते. मात्र, हे निवाडे शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असल्याचा दावा करण्यात आला. विशेषतः बाजारमूल्य निश्चिती, खरेदी-विक्री व्यवहारांचा विचार आणि मोबदल्यासोबत देय व्याज या बाबींवर शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, महसूल व वन विभागाने २४ जानेवारी २०२३ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे जमिनींचे बाजारमूल्य निश्चित करण्यात आले. या पद्धतीनुसार प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या तारखेपासून लगतचे एक वर्ष वगळून त्यापूर्वीच्या तीन वर्षांतील खरेदी-विक्री व्यवहारांचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, या शासन निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. ॲड. अजित बबनराव काळे आणि ॲड. साक्षी अजित काळे यांच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेल्या याचिकेत या शासन निर्णयाला आव्हान देण्यात आले.

न्यायालयीन प्रक्रियेत सदर शासन निर्णय रद्दबातल ठरल्याचा दावा याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला. तरीही संगमनेर येथील भूसंपादन प्रक्रियेत त्याच शासन निर्णयाचा आधार घेत निवाडे करण्यात आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मूळ गावातील आणि लगतच्या गावांमधील अधिक मूल्य असलेले खरेदी-विक्री व्यवहार विचारात न घेतल्याने जमिनीचे बाजारमूल्य कमी ठरविण्यात आल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले. याचिकेवरील सुनावणीदरम्यान प्रशासनाने तयार केलेले अंतिम निवाडे चुकीच्या पद्धतीचे आणि शेतकऱ्यांच्या हिताला बाधक असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. निवाडे नव्याने तयार करून सध्याच्या बाजारमूल्यानुसार मोबदला निश्चित करावा तसेच कायद्यानुसार देय व्याजासह भरपाई अदा करावी, अशी मागणी करण्यात आली.

या युक्तिवादाची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने वडझरी बु., तळेगाव, मिरपूर आदी गावांशी संबंधित प्रशासनाच्या अंतिम निवाड्यांना स्थगिती दिली. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना पुढील कायदेशीर लढ्यासाठी दिलासा मिळाला असून वाढीव मोबदल्याचा मार्ग मोकळा झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महामार्गासाठी जमीन संपादित झालेल्या पंचक्रोशीतील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी ॲड. अजित बबनराव काळे, ॲड. साक्षी अजित काळे आणि सहाय्यक ॲड. आरिफ पटेल यांचे आभार मानले.

ॲड. अजित बबनराव काळे आणि ॲड. साक्षी अजित काळे यांनी, शेतकऱ्यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत वाढीव मोबदल्यासाठीची कायदेशीर लढाई पुढेही सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काळे लॉ फर्मच्या माध्यमातून प्रयत्न सुरूच राहतील, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

### व्याजाच्या रकमेवरही शेतकऱ्यांचा आक्षेप

दरम्यान, २९ डिसेंबर २०२३ रोजी निवाडे घोषित झाल्यानंतर मोबदल्याची रक्कम शेतकऱ्यांना तत्काळ अदा करण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. १३ मे २०२६ रोजी प्रशासनाकडून पेमेंट नोटिसा देण्यात आल्या; मात्र विलंबाच्या कालावधीतील कायदेशीर व्याजाची रक्कम देण्यात आली नसल्याचा शेतकऱ्यांचा आक्षेप आहे.

### वकिलांनी शेतकऱ्यांचा मुद्दा उच्च न्यायालयात मांडला

अन्याय झाल्याची भावना असलेल्या संबंधित गावांतील शेतकऱ्यांनी ॲड. अजित बबनराव काळे, ॲड. साक्षी अजित काळे आणि त्यांचे सहाय्यक ॲड. आरिफ नुरा पटेल यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर शेतकऱ्यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आल्या.